







आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई कार्यालय.
पत्ता : १७, चंचल स्मृती, गं.द.आंबेकर मार्ग, श्रीराम इंडस्ट्रियल इस्टेट समोर, वडाळा, मुंबई– ४०००३१. महाराष्ट्र
E-mail-samparka@rmponweb.org
web: www.rmponweb.org, www.kec.rmpweb.org

आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabhodhini

वार्षिक अहवाल
२०१८-२०१९

प्रस्तावना

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीस २०१८-१९ चा वार्षिक अहवाल सादर करताना मनापासून आनंद होत आहे. गेल्या अनेक वर्षांच्या अभिनव व नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या साखळीतले आणखी हे एक वर्ष! कार्यक्रमातील कल्पकता, गुणवत्ता ही प्रबोधिनीची वैशिष्ट्ये जपत या शृंखलेतील अनेक कार्यक्रम या वर्षभरात योजण्यात आले.

देशातील उद्योजकीय प्रतिभेला चालना देणाऱ्या केंद्र सरकारच्या अटल इन्क्युबेशन सेंटर योजनेअंतर्गत नीती आयोगाच्या सहकार्याने प्रबोधिनीच्या अटल प्रतिभा पोषण केंद्राचा झालेला शुभारंभ, एन्.एच्.आर्.डी. नेटवर्क बरोबर सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी श्रीनगर येथे प्रथमच योजलेला नैतिक नेतृत्व विकास कार्यक्रम हे प्रबोधिनीचे अहवाल वर्षातील नावीन्यपूर्ण उपक्रम.

भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थानच्या (आय्. आय्. डी. एल) द्वितीय तुकडीचा प्रारंभ, सुशासन विषय घेऊन योजलेली स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनीधी व शासकीय प्रतिनिधींची राष्ट्रीय परिषद, ग्रामीण भागात महिलांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणाऱ्या मोदी सरकारच्या ''उज्वला योजनेचे योगदान''यावरील परिषद, आसाममधील नागरिक नोंदणी या विषयावरुन देशभर गाजलेल्या एन्.आर्.सी या विषयावर दिल्लीत झालेले राष्ट्रीय चर्चासत्र, शहरी नक्षलवाद विषयावर मुंबईत घडवून आणलेली चर्चा हे विशेष प्रबोधनाचे उपक्रम !

संशोधनव सामाजिक पाहणीच्या विषयांत महाराष्ट्र सरकारच्या मागेल त्याला शेततळे या महत्त्वाकांक्षी योजनेच्या २२१४ शेततळ्यांची समक्ष पाहणी तसेच नागपूर विभागातील सिंचन विहिरींचे मूल्यमापन करुन प्रबोधिनीने संशोधन विभागास अधिक सशक्त केले.

रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यानाअंतर्गत भाजपाचेराष्ट्रीय अध्यक्ष अमितशाह यांनी आर्य चाणक्य जीवन आणि कार्य: वर्तमान संदर्भात या विषयावर दिलेले अभ्यासपूर्ण भाषण तसेच प्रबोधिनीच्या संकुलात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनराव भागवत यांच्या उपस्थितीत झालेल्या प. दीनदयाळ उपाध्याय प्रस्तावित संग्रहालयाचे भूमीपूजन, या अहवाल वर्षातील उत्साह देणाऱ्या घटना होत.

वार्षिक अहवाल २०१८-२०१९

अहवाल वर्षातील कार्यक्रम-संख्यात्मक दृष्टिक्षेप तक्ता

क्र.	कार्यक्रम		कार्यक्रमाची संख्या	सहभागी संख्या
१.	प्रशिक्षण	सामाजिक	२१	८०७
		राजकीय	९	१३८७
२.	प्रबोधन		२५	५०४९
३.	अटल प्रतिभा पोषण केंद्र		१	७०
४.	पुस्तक प्रकाशन		१	२००
५.	संशोधन		६	३८९
६.	रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आंतराष्ट्रीय कक्ष		२	३३
७.	अन्य		४	५९०
	एकूण		**६९**	**८७२५**

महिला-२९२३	पुरुष-५६०२	**एकूण -८५२५**

सुशासन संगम



सुशासन संगम ही संकल्पना घेऊन प्रबोधिनीच्या ज्ञान–नैपुण्य केंद्रात २०, २१ जानेवारी २०१९ या कालावधीत राष्ट्रीय परिषद योजण्यात आली होती. समाजाच्या विविध क्षेत्रात सुशासन हे मूल्य कृतीशीलतेच्या अनुषंगाने स्वीकारले जावे, या उद्देशाने ही परिषद योजण्यात आली होती.

उद्घाटन सत्रात परिषदेची भूमिका महासंचालक रवींद्र साठे यांनी मांडली. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात या संकल्पनेला अधिक महत्त्व आले. राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह यांनी उद्घाटक या नात्याने आपले विचार मांडले. मागील सरकारने केवळ सुशासनाबाबत माहिती संकलित केली, पण या सरकारने सुशासनाच्या दृष्टीने ठोस पावले उचलली. कार्यपद्धती निर्दोष करण्यासाठी प्रयत्न केले. संरक्षण साहित्यासाठी विदेशावर अवलंबून राहण्यापेक्षा देशांतर्गत निर्मितीला प्राधान्य दिले. करदात्यांच्या संख्येत याच शासनाच्या प्रयत्नांमुळे वाढ झाली आहे. अशी अनेक उदाहरणे त्यांनी सहभागींसमोर ठेवली.

प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी परिषदेचे बीजभाषण केले. सुशासन म्हणजे तंत्रज्ञान आणि मानवी प्रेरणा, आदर्शवाद व व्यावहारिकता, व्यक्तिवाद, सामूहिकता, व्यवसायनिष्ठा व मानवीयता, मूलभूत गरजा व व्यक्ती स्वातंत्र्य अशा विविध गोष्टींमधील संतुलन केवळ चांगले काम करून चालणार नाही तर त्यातून साधले गेलेले योग्य पद्धतीने सादरही केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. केवळ सरकारच्या प्रयत्नातून सुशासन साध्य होणार नाही तर नागरिकांनीही यामध्ये सहभाग दिला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी बीज भाषणात मांडली.

प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनीही सुशासनाबाबतचे आपले विचार मांडले. उत्तरदायित्वाविना स्वायत्तता हे अनागोंदीला आमंत्रण ठरेल. त्यातून स्वार्थी लोकांचा फायदा होईल. त्यामुळे मूलभूततेकडे परत जाणे, मूल्याधिष्ठित व्यवस्था नव्याने उभी करणे असा काही गोष्टींचा विचार किंबहुना यावर ठोस कृती करावी लागेल, असे ते म्हणाले. या व्यतिरिक्त परिषदेत ३ एकत्रित व ४ गटशः सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.



सुशासनाच्या संदर्भात कार्य सुरू असून मन–की–बातमुळे लोकांसमोर आलेल्या ६ व्यक्तिंनी आपल्यास कामाचे सादरीकरण दोन सत्रांमधून केले. स्मार्ट गाव, सेव्ह द स्पॅरो, दिव्यांग सेवा इ. सहा संस्थांच्या प्रतिनिधींनी सुशासनाच्या अनुषंगाने त्यांच्या संस्थां करत असलेल्या कामाचे सादरीकरण सहभागींसमोर केले. सरकार व स्ववयंसेवी क्षेत्राच्या परस्पर सहकार्याने सुशासन, सुशासनाचे विविध पैलू अशा संकल्पनांवर गटशः सत्रे झाली. प्रामुख्याने विद्यापीठ शिक्षणातून सुशासन, सरकारच्या ग्रामविकास कार्यक्रमांच्या उत्तरदायित्वाची चौकट, एकविसाव्या शतकाचा नवीन मंत्र सुशासन, क्षमता संवर्धनातून सुशासन, औषध व्यवसायात सुशासन, भारताच्या पुरातन साहित्यातून वर्तमान राजकीय नेतृत्व

आणि सुशासन, प्रधानमंत्री जन औषधी परियोजनेचे विश्लेषण अशा विषयांवर गटशः सत्रे झाली. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या सत्रांमधून सहभागींना मार्गदर्शन केले. यांत दीनदयाळ शोध संस्थानचे अतुल जैन, प्रियांक कानूनगो (राष्ट्रीय बालहक्क आयोग) ललितजैन (सहआयुक्त, सिरमोर हिमाचल प्रदेश), मंजुलकुमार (डिक्की), ॲम्बॅसॅडर असोक कुमार मुखर्जी, रमण कल्याणकृष्णन, (टाटा ट्रस्ट), डॉ. एस.जी. काशीकर, नागपूर, संतोष गुप्ता (आय्.एस्.आर्.एन्. दिल्ली), भारतीय सनदी अधिकारी एस्. सुरेश कुमार, गांधीवादी कार्यकर्ते बसंतकुमार, क्षिप्रा शुक्ला (अध्यक्ष, यु. पी.आय्.डी.) करण भसीन व विदुषी यांचा समावेशहोता.

या निमित्ताने माहिती आणि जनसंपर्क विभाग (महाराष्ट्र), जनसंपर्क संपर्क विभाग (हिमाचलप्रदेश), भारत दूरसंचार निगम लिमिटेड, संस्कृती मंत्रालय (केंद्रसरकार) व काही स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या कार्याचीमाहिती देणाऱ्या स्टॉल्सचे प्रदर्शनही लावले होते. रवींद्र साठे यांनी परिषदेचा समारोप केला.

ग्रामीण जीवनात उज्ज्वला योजनेचे योगदान

भारत सरकारने ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी २०१४ नंतर विविध मार्गांनी प्रयत्न सुरू केले. त्यातील एक प्रयत्न म्हणजे उज्ज्वला योजना. देशाच्या ग्रामीण व दुर्गम भागात राहणाऱ्या महिलांना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ७० वर्षांनी आजही चूल वापरावी लागते, हे विदारक वास्तव आहे. चुलीसाठी लागणारा लाकूड-फाटा गोळा करण्यासाठी झेलावा लागणारा त्रास आणि प्रत्यक्ष चुलीवर स्वयंपाक करताना होणारा धुराचा त्रास लक्षात घेऊन २०१४ मध्ये केंद्र सरकारने महत्त्वाकांक्षी उज्ज्वला योजनेला प्रारंभ केला. ग्रामीण भागातील महिलेच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्याचबरोबर तिचे श्रम आणि वेळ वाचविणे हे हेतू त्यामागे होते. पर्यावरण रक्षणाचा व्यापक हेतूही यामधून साध्य होणार होता. योजना प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्यावर हे हेतू मोठ्या प्रमाणात साध्य होत असल्याचे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर उज्ज्वला योजनेच्या लाभार्थी महिलांची एकदिवसीय परिषद सोमवार, १० डिसेंबर २०१८ रोजी मुंबईत आयोजित करण्यात आली होती. पालघर, ठाणे, रायगड, मुंबई उपनगर, धुळे, चंद्रपूर, रत्नागिरी या महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील सुमारे ४५० लाभार्थी महिला या परिषदेत सहभागी झाल्या होत्या. एम.पी.सी.एल्., आय्.ओ.सी.एल्. बी.पी.सी.एल्. या कंपन्यांचे आर्थिक योगदान सदर परिषदेस लाभले.



उज्ज्वला परिषदेमध्ये भाषण करताना श्री. धर्मेंद्र प्रधान

केंद्रीय तेल व नैसर्गिक वायूमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या एकदिवसीय परिषदेचे उद्घाटन केले. महिलांच्या सक्षमीकरणात उज्ज्वला योजनेचे महत्त्व काय आहे, हे त्यांनी देशभरातून घेतलेल्या अनुभवांच्या आधारे विषद केले. या योजनेत ज्या त्रुटी दिसून येतात, त्यात सरकार दूर करत आहे, पण प्रत्यक्ष लाभार्थींनीही काही सूचना केल्यास ही योजना शंभर टक्के निर्दोष करण्यासाठी सरकार बांधील आहे, हेही त्यांनी नमूद केले. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, भारतीय

जनता पार्टी, मुंबईचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार, प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समिती सदस्या रेखा महाजन व महासंचालक रवींद्र साठे उपस्थित होते. महिला आरोग्य, सक्षमीकरण व पर्यावरण पूरकता या अनुषंगाने उज्ज्वला योजनेचे योगदान काय आहे, अशी तीन चर्चासत्रातून मांडणी करण्यात आली. ग्रामीण आरोग्यात या योजनेमुळे होणारे परिवर्तन / विकास या चर्चासत्रात डॉ. हर्षदा देवधर आणि केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाचे सचिव राजीव मल्होत्रा सहभागी झाले होते. विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली हे चर्चासत्र झाले.

केंद्रीय बाल हक्क सुरक्षा आयोगाचे सदस्य प्रियांक कानुनगो यांच्या अध्यक्षतेखाली 'महिला सक्षमीकरण आणि उज्ज्वला योजना' हे सत्र झाले. अमरावती जिल्ह्यातील 'संपूर्ण बांबू केंद्र' या संस्थेच्या निरुपमा देशपांडे आणि रायपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या शताब्दी पांडे यांनी गोंदियातील महिला सरपंच रचना शहाणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उज्ज्वला योजनेची पर्यावरणपूरकता या सत्रात सहभाग घेतला. डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या उद्‌बोधनाने या परिषदेची सांगता झाली.

जम्मू-काश्मीर : विचार, मूल्यांकन, नियोजन

प्रबोधिनीने ८ - ९ डिसेंबर २०१८ रोजी जम्मू-काश्मीरबाबत विचार मंथन, मूल्यांकन करणे व या अनुषंगाने पुढील नियोजन करणे ही संकल्पना घेऊन जम्मू काश्मीर अध्ययन केंद्राच्या सहयोगाने दोन दिवसीय चर्चासत्र योजले होते. भारतीय जनता पार्टीचे महामंत्री व जम्मू-काश्मीरचे प्रभारी राम माधव यांनी चर्चासत्राचे उद्‌घाटन केले. जम्मू-काश्मीर विषयाच्या अभ्यासक डॉ. शक्ती सिन्हा यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुंबई महानगर संघचालक, सुरेश भगोरिया, जवाहरलाल कौल आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. या चर्चासत्रात १६६ प्रतिनिधी उपस्थित होते.



जम्मू-काश्मीर विषयावर आयोजित चर्चा सत्रात बोलताना उद्‌घाटक राम माधव

राम माधव आपल्या भाषणात म्हणाले की जम्मू-काश्मीरकडे आतापर्यंत काश्मीर खोऱ्याच्या चष्म्यातून पाहिले गेले. पण या प्रश्नाकडे जम्मू-काश्मीर एक राज्य आहे या दृष्टिकोनातून पाहिले गेले पाहिजे. जम्मू-काश्मीर अन्य राज्यांप्रमाणेच विविधतेने नटलेला आहे. १९४७ मध्ये पाक पुरस्कृत हल्ल्यात ११ हजार लोक मारले गेले. राज्यातील सरकारकडे केवळ अतिरेकी नियंत्रण यंत्रणा एवढ्यापुरतेच न पाहता राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या भूमिकेतून त्याचे मूल्यांकन केले गेले पाहिजे. १९५०च्या दशकात शेख अब्दुल्लांना तुरुंगात टाकल्यानंतर काही काळ २००३-०८ या कालावधीत तीन वर्षे काँग्रेस वगळता राष्ट्रीय पक्ष सत्तेवर नव्हते. त्यामुळेच काश्मीरकडे अन्य

राज्यांप्रमाणेच विकासाच्या दृष्टीनेच पाहिले गेले पाहिजे, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. जवाहरलाल कौल यांनी 'जम्मू –काश्मीरची लोक संस्कृती' या विषयावर मार्गदर्शन केले. इ.स.पूर्व ३००० वर्षापासूनचा इतिहास, परंपरा त्यांनी सहभागींसमोर मांडला. काश्मीर खोऱ्यात सरोवर, डोंगरदऱ्या यांचे वर्णन करतानाच विविध समाजात आजही सुरू असलेल्या पुरातन परंपरांची माहिती त्यांनी दिली. श्रीनगर शहराची निर्मिती मौर्य राजा अशोकने केल्याचे त्यांनी सांगितले. बौद्ध, वैष्णव आणि शैव पंथाचा प्रभाव या क्षेत्रावर अधिक आहे. ललितादित्य राजाने तर थेट दक्षिणेपर्यंत आपल्या साम्राज्याचा विस्तार केला, असे ते म्हणाले.




जम्मू–काश्मीरमधील आंदोलनात्मक अशांत स्थिती काश्मीरच्या मुसलमानांनी नव्हे तर पंजाबी मुसलमानांनी सुरू केली आहे. अशा विविध घटनांमधून वैविध्याने व परस्पर साहचार्याने नटलेला जम्मू–काश्मीर मधील आजच्या स्थितीपर्यंतचा इतिहास त्यांनी संक्षेपाने मांडला.

आशुतोष भटनागर यांनी काश्मीरचे भारतात सामिलीकरण व एकात्मता या सत्रात मार्गदर्शन केले तर इंडिया फाऊंडेशनचे संचालक आलोक बन्सल यांनी एका सत्रात मार्गदर्शन केले.

रा. स्व. संघाचे प्रचार प्रमुख अरुण कुमार म्हणाले, जम्मू–काश्मीरची समस्या त्या राज्यात नसून दिल्लीत आहे. देशभरात या विषयाबाबत संभ्रम आहे, अपुरी माहिती आहे, दृष्टिकोनात अंतर आहे, त्यामुळे योग्य धोरण बनणे अवघड आहे. जम्मू–काश्मीर बाबतचे गैरसमज, चुकीची माहिती यातून बाहेर येऊन योग्य अध्ययन व्हावे यासाठी जम्मू–काश्मीर अध्ययन केंद्राची स्थापना झाली, असे त्यांनी नमूद केले. 'जम्मू–काश्मीरच्या संदर्भात प्रसार माध्यमांची भूमिका काय राहिली आहे? काय असायला हवी' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार आभा खन्ना यांचे सत्र झाले. या परिषदेचा समारोप अरुणकुमार यांनी केला. हा विषय खूप मोठा आहे, नीट समजून घ्यायचा तर वेळही पाहिजे. या विषयाचे विविध पैलू समजून घेतले पाहिजेत, या सर्वांसाठीच जम्मू – काश्मीर अध्ययन केंद्राची स्थापना झाली आहे. मात्र सर्व अंगांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. विद्याभारती, एकल विद्यालय, विश्व हिन्दू परिषद अशा विविध संस्था त्यांच्या कामातून जम्मू –काश्मीर अखंड ठेवण्यासाठी व भारताचा भाग आहोत, ही भावना बळकट करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. देश व जम्मू–काश्मीरमध्ये फुटीरतावादीपण सक्रिय आहेत. पण अशा लोकांना हळूहळू पाठिंबा कमी होत चालला आहे. जम्मू–काश्मीर विषयाबाबत संपूर्ण देशभरात विविध क्षेत्रातील लोकांपर्यंत आपला संपर्क वाढला पाहिजे. आपापल्या पातळीवर या विषयाबाबत सजगता येण्यासाठी उपक्रम योजले गेले तर या परिषदेची सफलता आहे, असे त्यांनी सांगितले.

एनआरसी-डिफेंडिंग दि बॉर्डर...सिक्युअरिंग दि कल्चर...



एन.आर.सी. विषयक राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना आसामचे मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल

आसाम मधील नागरिक नोंदणीवरून देशभर गाजलेल्या आणि वादग्रस्त ठरलेल्या 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स' अर्थात भारतीय नागरिकांच्या राष्ट्रीय नोंदणीबाबतच्या विषयावर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने नवी दिल्ली येथे १० सप्टेंबर २०१८ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडियामध्ये झालेल्या या चर्चासत्रात आसामचे मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल, भाजपाचे राष्ट्रीय महासचिव राम माधव आणि 'माय नेशन' चे मुख्य संपादक अभिजित मजुमदार यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री सोनोवाल यांनी बांगलादेशी घुसखोरांमुळे निर्माण झालेल्या आणि चिघळलेल्या या प्रश्नाची सविस्तर आणि सखोल मांडणी केली. वाढत्या घुसखोरीमुळे राष्ट्रीय नागरिक नोंदणी कठीण होत असून ही बाब चिंताजनक आहे आणि त्यामुळे आसामच्या सांस्कृतिक अस्तित्वाला धक्का पोहोचण्याचा धोका आहे, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. या पार्श्वभूमीवर नागरिक नोंदणी रजिस्टर तातडीने अद्ययावत करण्याची गरज असून त्यामध्ये मूलनिवासी भारतीय आणि कालांतराने स्थलांतरित झालेले नागरिक यांची पूर्णपणे विभिन्न मांडणी करावी. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांना पुढील उपाययोजना करणे सोपे जाईल, असेही ते म्हणाले.

आजवरच्या केंद्रातील सरकारांनी विविध देशातून भारतात बेकायदेशीरपणे स्थायिक झालेल्या स्थलांतरितांबाबत कोणतीही ठोस उपाययोजना केली नाही. त्यामुळे घुसखोरांचे लोंढे वाढत राहिले. यामुळे आज आसाममधील जनतेच्या संस्कृती, भाषा आणि जीवनमानालाच धोका पोहोचत आहे. त्यामुळे या बेकायदा स्थलांतरितांना मुत्सद्दीपणाने मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू केली जाईल, असे प्रतिपादन राम माधव यांनी केले.

प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ.विनय सहस्त्रबुद्धे, हिमालयन युनिव्हर्सिटीचे संस्थापक हेमंत गोयल आणि ज्येष्ठ पत्रकार समुद्रगुप्त कश्यप यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमास दिल्लीतील सुमारे ३०० नागरिक, पत्रकार, उपस्थित होते.

शहरी नक्षलवाद

'शहरी नक्षलवाद' या विषयावर मुंबईतील इंडियन मर्चंटस् चेंबरमध्ये २८ नोव्हेंबर २०१८ रोजी या विषयाचे अभ्यासक, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांच्याशी संवादाचा कार्यक्रम योजण्यात आला होता. सामाजिक कार्यकर्त्या प्रीती गांधी यांनी विवेक अग्निहोत्रींशी संवाद साधत उपस्थित ३०० पेक्षा अधिक उपस्थितांसमोर हा विषय उलगडत नेला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी केले. प्रबोधिनीच्या विषयाच्या आयोजनामागची भूमिका त्यांनी मांडली. १९८९-९० मध्ये महाराष्ट्रात गडचिरोली भागात नक्षलवादी कारवायांना सुरुवात झाली, त्याचा पहिला अभ्यास प्रबोधिनीने केला होता. छत्तीसगडमधील नक्षलवादी कारवाया, त्याला नियंत्रणात ठेवण्यासाठी सुरू झालेले सलवा जुडूम अभियान यावरही प्रबोधिनीतर्फे अभ्यासगट पाठविण्यात आला होता. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनीही नक्षलवाद हा देशाला असलेला मोठा धोका आहे, हे २००९ मध्ये म्हटले होते. या सगळ्यातच जंगल क्षेत्र या सुदूर क्षेत्रात असलेल्या या कारवायांना गेल्या काही वर्षात शहरातून बुध्दिजीवी म्हणवल्या जाणाऱ्या वर्गाकडून समर्थन मिळू लागले आहे, ज्याला आज शहरी नक्षलवाद म्हटले जाते आणि समाजामध्ये याबद्दल पुरेशी जाण उत्पन्न व्हावी म्हणूनच या विषयाचे समग्र चिंतन करणाऱ्या विवेक अग्निहोत्री यांच्याशी संवाद आयोजित करण्यात आला, असे रवींद्र साठे यांनी सांगितले.



विवेक अग्निहोत्री

विवेक अग्निहोत्री यांनी नक्षलवादाचा उगम प. बंगाल मधील नक्षलबाडी या गावात झाला आहे, असे सांगितले. त्याच काळात शांततामय मार्गाने विनोबा भावे भूदान अभियान चालवीत होते तर नक्षलवादी हिंसा करून जमीनदारांना लुटत होते. पण पद्धतशीरपणे भूदान चळवळ लोकांच्या विस्मृतीत जाईल अशी व्यवस्था केली गेली. तर



हिंसात्मक पद्धतीने कार्य करणारे नक्षलवादी गरिबांचे उद्धारकर्ते आहेत हे ठसविण्याचे प्रयत्न झाले. इंदिरा गांधींना अन्य कोणी पाठिंबा देत नसताना डाव्यांनी दिला, तो अटी घालून. डाव्यांनी शिक्षण क्षेत्र या अटीद्वारे आपल्या ताब्यात घेतले आणि इतिहास व देशाच्याा मानसन्मानाच्या अनेक गोष्टींमध्ये बदल करून जनमानसाला चुकीच्या दिशेने कसे नेले याचे विवेचन त्यांनी केले. विविध सामाजिक संस्थांच्या या

बाबतीतल्या शंकास्पद भूमिका तसेच या घातक चळवळीस मिळणारे आर्थिक स्त्रोत इ. गोष्टी त्यांनी सर्वांसमोर उदाहरणे देत मांडल्या. तसेच हा राजकीय पक्षांमधील संघर्ष नसून राष्ट्रवादाला उखडून टाकण्यासाठी जन्मलेली वृत्ती आहे, असेही त्यांनी सांगितले. शहरात महाविद्यालयातून मुलांना नक्षलवादाबाबत अनुकूल करण्याची त्यांची पद्धतही सर्वांसमोर ठेवत त्यांनी यापासून आपण सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे तसेच या सगळ्या गोष्टींचा नीट प्रतिवाद करण्याची आवश्यकता व्यक्त केली. या संवाद प्रक्रियेनंतर उपस्थितांनीही या विषयासंदर्भात अनेक प्रश्न विचारले.

'संकल्प से सिद्धी' – प्रतिज्ञा नवभारताच्या निर्मितीची...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑगस्ट २०१७ मध्ये 'संकल्प से सिद्धी' या उपक्रमाची घोषणा केली. २०२२ पर्यंत लोकसहभागातून देशातील अस्वच्छता, गरिबी, जातीयतावाद, धार्मिक–गटांमधील वैमनस्य, भ्रष्टाचार, आतंकवाद इ. समस्यांचे उच्चाटन करून भारताला आमूलाग्र बदलून टाकण्याचे ध्येय असलेला हा उपक्रम आहे. पंतप्रधानांच्या आवाहनाने प्रेरित होऊन, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने या उपक्रमात सहभागी होण्याचे ठरवले. यासाठी गांधी स्मृती व दर्शन समिती या भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या स्वायत्त संस्थेचे साहाय्य घेण्यात आले.



हा उपक्रम उत्तर पूर्व भारतात शालेय विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत,

१. शाळांना सांस्कृतिक गट बनवण्यास प्रोत्साहन दिले गेले.

२. सांस्कृतिक गटांच्या माध्यमातून 'संकल्प से सिद्धी ' या विषयावरील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

३. विद्यार्थ्यांना स्पर्धेची पुस्तिका दिली गेली. त्यामधून त्यांना या मोहिमेत कशा प्रकारे सहभागी होता येईल यावर विचार–विनिमय करण्यासाठी प्रेरित करण्यात आले. या वेळी प्रश्नमंजुषा, निबंधलेखन, ब्रीदवाक्य–लेखन इ. स्पर्धांचे आयोजन केले गेले.

४. शाळेच्या सभेमध्ये विद्यार्थ्यांनी नूतन भारताच्या निर्मितीसाठी कटिबद्ध असल्याची प्रतिज्ञा घेतली.

या उपक्रमाच्या निमित्ताने शाळांसोबत निर्माण झालेला संपर्क आणखी दृढ व्हावा यासाठी शाळांच्या प्राचार्यांसाठीही अभिमुखता कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. राज्यांच्या राजधान्यांमध्ये विशेषतः गुवाहाटी, अगरताळा, शिलाँगमध्ये या कार्यशाळा घेण्यात आल्या. यामधील पहिली कार्यशाळा शिल्पग्राम, गुवाहाटी, आसाम येथे १० जुलै २०१८ ला आयोजित केली गेली होती. यात ३०६ शाळांनी भाग घेतला. दुसरी कार्यशाळा राष्ट्रीय तंत्रविज्ञान संस्था अगरताळा, त्रिपुरा येथे ११ जुलै २०१८ ला आयोजित केली गेली होती त्यामध्ये १७० शाळांच्या प्राचार्यांनी भाग घेतला. तिसरी कार्यशाळा नॉर्थ ईस्टर्न हिल विद्यापीठ, शिलाँगमध्ये १३ जुलै २०१८ ला आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये ९५ प्राचार्य सहभागी झाले होते. या प्राचार्यांच्या माध्यमातून दोन लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा दिली गेली.

गोहाटी व आगरताळा येथील कार्यक्रमांमध्ये अनुक्रमे डॉ. पीलो हजारिका (गोहाटी), सुनिता चंगकट्टी (गोहाटी) प्रियांक कानूनगो, रवी पोखरणा, प्रा. एम्.के.शर्मा, डॉ. गोविंद भार्गव, अजित चंद्रदास (आगरताळा, त्रिपुरा) तर शिलाँग येथे मीरा खरखोन्गोर, डब्लू. आर. लिंगडोह, नेहू विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. एस्. के. श्रीवास्तव, प्रा. हेन्री, प्र–कुलगुरु, ए.सी. मारक हे मान्यवर उपस्थित होते. या तीनही कार्यक्रमाच्या आखणी व कार्यवाहीत दिल्ली येथील नितिन अग्रवाल यांचे सहकार्य मिळाले.

मध्य प्रदेश – ग्रामविकास दिशा दर्शन शिबिर



प्रबोधिनीच्या वतीने मध्य प्रदेश जन अभियान परिषद या राज्यस्तरीय सरकार पुरस्कृत सामाजिक संस्थेच्या विविध स्तरांवरील कार्यकर्त्यांचे शिबिर १५ ते १८ मे या कालावधीत योजण्यात आले होते. 'ग्रामविकासाची दिशा' या विषयावर झालेल्या या शिबिरात ८६ पुरुष व २३ महिला मिळून एकूण १०९ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

प्रबोधिनीचे कार्यकारी प्रमुख रवी पोखरणा यांनी या शिबिराचे उद्घाटन केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ डिंबळे यांनी ग्रामविकासाची दिशा कशी निश्चित करायची? आणि समग्र ग्रामविकासात पूर्वाभ्यासाची आवश्यकता या दोन विषयांवर सहभागींना मार्गदर्शन केले. ग्रामविकास करण्यापूर्वी नेमके कोणते मुद्दे लक्षात घेतले पाहिजेत, हे समजून घेण्यासाठी विकास म्हणजे काय, ग्रामविकास म्हणजे काय, गावात काय उपलब्ध आहे वा नाही, नेमके कशा पद्धतीने या सर्वांचा विचार केला पाहिजे, या अनुषंगाने दोनही सत्रात त्यांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

ग्रामविकासाचे वेगवेगळे पैलू या दोन सत्रांमधून झालेल्या विषयाची मांडणी स्वयंसेवी संस्था उभरणी विषयाचे सल्लागार विवेक अत्रे यांनी केली. ग्राम स्वच्छता, पाणी, शिक्षण व्यवस्था या बिंदूंच्या आधारे त्यांनी हा विषय सर्वांसमोर मांडला. ग्रामविकासाच्याा कार्यात सरकारच्या योजना तर आहेत, मात्र या योजनांचा लाभ कसा घ्यावा, त्यासाठी काय केले पाहिजे, यावर त्यांनी सत्रात मार्गदर्शन केले.

केशव सृष्टी परिसरात ग्रामविकासाचे वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत. या प्रयोगांची माहिती समक्ष जाऊन सर्व सहभागींनी घ्यावी, यासाठी प्रत्यक्ष भेटीचे एक सत्र झाले. यात वनौषधी लागवड, जल नियोजन, पशुधन संवर्धन, कृषी संबंधी प्रयोग याची माहिती सहभागींना मिळाली.

ग्रामविकासात स्वयंरोजगाराचे महत्त्व आहे. या स्वयंरोजगारातून व्यक्तिमत्त्व विकास कसा साधायचा,



शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी रवी पोखरणा आणि रामभाऊ डिंबळे

याची मांडणी खादी व ग्रामोद्योग आयोगाचे अधिकारी वाय. के. बारामतीकर यांनी स्वयंरोजगार व व्यक्तिमत्त्व विकास या सत्रात केली.

'पाणी' विषयात प्रत्यक्ष काम करणारे आणि प्रबोधिनीच्या विलासराव साळुंके अध्यासनाचे मानद संचालक माधव भंडारी यांनी 'जलस्वावलंबनाची दिशा' या सत्रात मार्गदर्शन केले. पाऊस किती पडतो, गावांची भौगोलिक स्थिती कशी आहे, गावातील पाणी साठवण्याची व वापराची स्थिती काय आहे, या सर्वांच्या

आधारे पाण्याचे नियोजन करणे कसे आवश्यक आहे व कसे केले पाहिजे याची सोदाहरण माहिती त्यांनी सहभागींना दिली.

या कामात समाजातील विविध घटकांशी संवाद व समन्वय असणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन संवाद व समन्वय या सत्राची रचना करण्यात आली होती. प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे यांनी हा विषय सर्वांना समजावून सांगितला. ग्राम स्वच्छता अभियानाचे निकष आणि निसर्गाचा अभ्यास या दोन विषयांवर भगीरथ ग्रामविकास संस्थेचे संस्थापक डॉ. प्रसाद देवधर यांनी मार्गदर्शन केले. जन अभियान परिषदेचे उपाध्यक्ष प्रदीप पाण्डये यांच्या मार्गदर्शनाने या शिबिराचा समारोप झाला.

अरुणाचल प्रदेश – पदाधिकारी प्रशिक्षण

अरुणाचल प्रदेश हा विविध जनजातींचे रहिवासी असलेला प्रदेश आहे. सूर्य–चंद्राचे उपासक असलेले हे विविध समाज स्वतःची परंपरा आणि संस्कृती जपत आपले जीवन जगत आहेत. या जनजातींच्या संस्कृतीवर,परंपरांवर गेल्या काही दशकांपासून वेगवेगळी आक्रमणे होऊ लागली आणि या आक्रमणांचा योग्य पद्धतीने सामना करण्यासाठी १९९९ मध्ये 'इंडियन फेथ अँड कल्चरल सोसायटी' या राज्यस्तरीय संस्थेची स्थापना झाली.



प्रबोधिनीच्या वतीने या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण ८ ते १४ एप्रिल २०१८ या कालावधीत प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्रात योजण्यात आले होते. एकूण आठ पदाधिकारी या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. पदाधिकाऱ्यांना आपले कार्य आणि संस्था संचालनासाठी उपयुक्त अशा १७ विषयांचा या प्रशिक्षणात समावेश होता.

पूर्वांचल भागात दीर्घकाळ (१९६० – २०१४) कार्य केलेले सामाजिक कार्यकर्ते आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अरुण साठे यांनी या प्रशिक्षणाचे उद्घाटन केले. आपले कार्य काय? येणाऱ्या काळातील आव्हाने काय आहेत? पूर्वी राज्यातील स्थिती काय होती? आदींबाबत त्यांनी या पदाधिकाऱ्यांना उद्घाटन सत्रात मार्गदर्शन केले.

अरुणाचल प्रदेशात १९८६ ते २००२ या काळात प्रत्यक्ष सामाजिक कार्य केलेले नंदू जांगले यांनी भारताचा सामाजिक व सांस्कृतिक परिचय आणि संस्थेच्या कार्याची आवश्यकता या दोन विषयांवर सहभागींना मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ सामाजिक संस्था सल्लागार विवेक अत्रे यांनी संस्थेचे दृष्टीपत्र व ध्येय (व्हिजन आणि मिशन) हा विषय मांडताना संस्था संचालनात याचे महत्त्व काय? पदाधिकारी म्हणून आमची भूमिका काय? या गोष्टी सविस्तरपणे समजावून सांगितल्या. कार्यालय व्यवस्थांपन हा विषय प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे यांनी मांडला. सामाजिक सजगता आणि सामाजिक प्रश्नांचे आकलन हा विषय सुनील ढेंगळे तर नेतृत्व विषय जयंत रॉय यांनी समजावून सांगितला. संस्थेचे आर्थिक व्यवस्थापन आणि बैठकीचे आयोजन व संचालन याविषयी श्रीराम पटवर्धन यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक कामात चरित्र, पारदर्शकतेचे महत्त्व अरुण करमरकर यांनी समजावून दिले. आजच्या प्रचार युगात आपल्या कामाची प्रसिद्धी

कशी करावी हे सांगणारा 'माध्यम व्यवस्थापन' हा विषय प्रीती गांधी यांनी मांडला. सामाजिक कामात संवाद कौशल्य, परस्परसंबंध, समूह बांधणी या अनिवार्य गोष्टी आहेत. या विषयांवर अनिल पाटील यांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

काम करत असताना शारीरिक आणि मानसिक स्वास्थ संतुलनाच्या दृष्टीने योगाभ्यासाचे महत्त्व व प्रत्यक्ष किमान योग साधना करून घेणे यासाठी योगशिक्षक सोनल वऱ्हाडपांडे यांनी मार्गदर्शन केले. आपल्या कार्याचे, कार्यपद्धतीचे व अंतिमतः संस्थेंचे मूल्यांकन आपणच निःपक्षपणे केले पाहिजे. यासाठी मूल्यांकन या विषयावर सत्र रचना करण्यात आली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण प्रांत संघचालक व व्यवस्थापन विषयाचे अभ्यासक डॉ. सतीश मोढ यांनी मूल्यांकन विषयाची मांडणी केली.

पूर्वांचल भागात प्रत्यक्ष कार्य करण्याचा प्रदीर्घ अनुभव असलेले भाजपाचे सह संघटन मंत्री व्ही. सतीश यांच्या मार्गदर्शनाने या प्रशिक्षणाचा समारोप झाला.

बाल हक्क सुरक्षा आयोग कर्मचारी प्रशिक्षण



प्रबोधिनीने अहवाल वर्षात राष्ट्रीय बाल हक्क सुरक्षा आयोगाच्या (एन.सी.पी.सी.आर.) सहकार्याने बाल सुधारगृह कर्मचाऱ्यांसाठी 'ताण-तणाव व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा योजली होती. २५, २६ जून २०१८ रोजी झालेल्या या कार्यशाळेत महाराष्ट्रातील बाल सुधारगृहाचे ११ पुरुष व ९ महिला मिळून एकूण २० प्रतिनिधी सहभागी झाले होते.

राष्ट्रीय बाल हक्क सुरक्षा आयोगाचे सदस्य प्रियांक कानुनगो यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन केले. बाल सुधारगृहात समस्याग्रस्त मुले येतात, पण त्यांना सांभाळणाऱ्या लोकांना ज्या परिस्थितीत काम करावे लागते त्यातून एक मानसिक ताण त्यांच्यात निर्माण होण्याची मोठी शक्यता असते. त्यामुळेच या कर्मचाऱ्यांसाठी कदाचित संपूर्ण भारतात पहिल्यांदाच अशी कार्यशाळा योजण्यात येत आहे, असे प्रियांक कानुनगो यांनी आपल्या भाषणात सांगितले. देशभरात अशा कार्यशाळांची आवश्यकता असून प्रबोधिनीने याबाबत पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या कर्मचाऱ्यांनी सुधारगृहातील मुलांशी जवळीक साधण्यासाठी काय करता येईल, या सर्व कामात काय आव्हानं आहेत आणि नेमक्या अपेक्षा काय आहेत या अनुषंगाने गटचर्चा करण्यात आली. कर्मचाऱ्यांची या वातावरणात काय भूमिका असली पाहिजे आणि त्यांची जबाबदारी काय, या विषयावर बाल हक्क सुरक्षा आयोगाच्या प्रतिनिधीने सर्व सहभागींशी संवाद केला.

'तणाव व्यवस्थापन' या विषयावरील या कार्यशाळेत वैद्यकीय दृष्टीने तणाव व्यवस्थापन या सत्रात ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. जान्हवी केदारे यांनी मार्गदर्शन केले तर या असुरक्षित मुलांना समजून घेणे

म्हणजे काय, या विषयावर समतोल संस्थेचे संस्थापक विजय जाधव यांनी मांडणी केली.

तणाव व्यवस्थापनात मन आणि शरीर याबाबत संतुलन राखण्यासाठी दोन सत्रांची रचना करण्यात आली होती. चालणे, काही व्यायाम प्रकार, ध्यानधारणा या बरोबरच एखाद्या गोष्टींचा वेगळ्या पद्धतीने विचार करणे म्हणजे काय? या अनुषंगाने हा विषय प्रात्यक्षिक, खेळ याद्वारे चिराग साखरे यांनी समजावून सांगितला. या दोन सत्रांमधून आम्हाला आमच्या कामाकडे व कामातून येणाऱ्या तणावाला नियंत्रित ठेवण्यासाठी नवीन दृष्टी मिळाली, अशीच भावना सर्वांनी व्यक्त केली. आपल्यास कामाच्या ठिकाणी सकारात्मकता कशी निर्माण करायची, हे कृती सत्रातून या सर्व सहभागींकडून करून घेण्यात आले. प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य अरविंद रेगे यांच्या मार्गदर्शनाने कार्यशाळेचा समारोप करण्यात आला.

अन्य प्रशिक्षण कार्यक्रम

क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	एकूण संख्या
१.	२–३ जून २०१८	सामाजिक संस्थासाठी सी.एस.आर. कार्यशाळा	३२
२.	५ सप्टेंबर २०१८	अस्मिता सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था, मुबंई शिक्षक दिन	५५
३.	१७–१८ नोव्हेंबर २०१८	कार्यक्रम संयोजन प्रशिक्षण शिबिर	२६
४.	१६–१७ फेब्रुवारी २०१९	राजकीय कार्यकर्त्यांसाठी भाषणकला प्रशिक्षण शिबिर	३७
५.	२६–२७–२८ फेब्रुवारी २०१९	दोनी पोलो येलाम केबांग युवा नेतृत्व प्रशिक्षण शिबिर, अरुणाचल प्रदेश	१४
६.	२४ फेब्रुवारी २०१९	सुयोग हौसिंग सोसायटी, बोरिवली पदाधिकारी व सभासद प्रशिक्षण शिबिर	३५
		एकूण	**१९९**

कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने २०१६ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) यांच्याबरोबर केलेल्या करारानुसार कल्याण येथे निरनिराळ्या विषयांची प्रशिक्षणे एप्रिल २०१७ पासून घेण्यास सुरूवात केली. एप्रिल २०१८–२०१९ या कालावधीत पूर्ण झालेल्या प्रशिक्षणाची माहिती पुढीलप्रमाणे.

प्रशिक्षणाचा विषय	कालावधी	विद्यार्थी संख्या
असिस्टंट ब्यूटी थेरपिस्ट	६ महिने	२७
अकाऊंटिंग	५ महिने	४२

रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यान



रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने या वर्षात १२ वे रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यान पुणे येथे ८ जुलै २०१८ रोजी योजण्यात आले होते. 'आर्य चाणक्य – जीवन आणि कार्य : वर्तमान संदर्भात' या विषयावर योजण्यात आलेल्या या व्याख्यानाचे वक्ते भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार अमित शाह हे होते. आपल्या देशाच्या इतिहासात आर्य चाणक्य हे असे व्यक्तिमत्व आहे, ज्यांनी सत्तेच्या बाहेर राहूनही देशाच्या सांस्कृतिक व राजकीय विचारप्रवाहात आपले प्रभावक्षेत्र निर्माणकेले. चाणक्य यांनी सांगितलेल्या सिद्धांताची उपयुक्तता आजही कशी आवश्यक आहे याचे विवेचन अमितशाह यांनी केले.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात त्यांनी कौटिल्य अर्थशास्त्र, चाणक्य नीतीदर्पण, चाणक्य राजनैतिक शास्त्र, चाणक्य नीतीशास्त्र, चाणक्य सारसंग्रह, लघु चाणक्य, वृद्ध चाणक्य, चाणक्य सूत्रे, विष्णुगुप्त सिद्धांत या चाणक्यांनी लिहिलेल्या ग्रंथामधून राष्ट्र संकल्पना, लोकव्यवस्थापन, राजाची कर्तव्ये, व्यवहार, व्यापार आणि कररचना, परराष्ट्रनीती, कूटनिती, गुप्तचर यंत्रणा, आदि महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा ओहापोह केला.

या व्याख्यानाच्या पार्श्वभूमीवर २२ जून ते ३० जून दरम्यान युवकांसाठी ''आर्य चाणक्य'' या विषयावर एक निबंध स्पर्धाही घेण्यात आली. चाणक्याची राष्ट्रनिर्माणाची संकल्पना, चाणक्य एक व्यवस्थापन गुरु आणि चाणक्याची लोकक्षेमाच्या कल्पना हे त्याचे विषय होते. यांत १४५७ स्पर्धकांनी भाग घेतला. यशस्वी स्पर्धकांना अमितशाह यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. एम.टी.एज्युकेअर आणि कॅम्लिन हे या स्पर्धेचे प्रायोजक होते.



रामभाऊ म्हाळगी हे एक आदर्श लोकप्रतिनिधी होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे नामाभिधान लाभलेल्या प्रबोधिनीने त्यांच्या ७५ व्या जयंतीपासून रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यान योजण्यास प्रारंभ केला. आजवर या व्याख्यानात लालकृष्णा आडवाणी, सुषमा स्वराज, डॉ. प्रभाकर मांडे, सुरेश सोनी अशा विविध विचारवंत वक्त्यांनी आपले बहुमूल्य विचार व्यक्त केले आहेत.

पुस्तक प्रकाशन

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि माणूस प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''माणूस'' या मराठी साप्ताहिकाचे संस्थापक, संपादक आणि जुन्या पिढीतील ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत गणेश माजगावकर अर्थात 'माणूसकार श्रीगमा' यांच्या २५ निवडक मराठी लेखांचे संकलन असलेल्या ''दि नॅशनल कॉज – सिलेक्टेड रायटिंग्ज ऑफ एस.जी. माजगावकर'' या इंग्रजी अनुवादित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ शुक्रवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे करण्यात आला होता. या प्रकाशन समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे माजी मंत्री विनायकदादा पाटील, विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार अंबरीश मिश्र आणि अध्यक्ष म्हणून म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, श्रीगमांच्या लेखांचे अनुवादक आनंद आगाशे, प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे, माणूस प्रतिष्ठानच्या अध्यक्षा वंदना भाले आणि ज्येष्ठ विचारक विनय हर्डीकर उपस्थित होते. हा समारंभ पुण्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.



प्रकाशन समारंभात (डावीकडून)रवींद्र साठे,आनंद आगाशे,अंबरीश मिश्र,डॉ. विनय सहस्रबुद्धे,विनायकदादा पाटील,विनय हर्डीकर आणि वंदना भाले



हितचिंतक संमेलनात बोलताना राज्याचे महसूलमंत्री चंद्रकांत पाटील

हितचिंतक संमेलन

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या स्थापना दिनानिमित्त (१९ ऑक्टोबर) प्रबोधिनीच्या विकासात योगदान देणाऱ्या विविध व्यक्ती व संस्थांच्या प्रतिनिधींचे अर्थात हितचिंतकांचे संमेलन योजण्यात आले होते. २१ ऑक्टोबर रोजी योजण्यात आलेल्या या हितचिंतक संमेलनाचे उद्घाटन प्रबोधिनीचे सचिव आमदार मंगल प्रभात लोढा यांनी केले.

प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी गेल्या ३६ वर्षात झालेल्या विविध उपक्रम, वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांबरोबर विविध आयामांचेही सादरीकरण केले. प्रबोधिनीची भविष्यातील वाटचाल कशी असावी? कोणते उपक्रम केले पाहिजेत? हितचिंतक म्हणून आपले योगदान काय असेल? या मुद्यांच्या आधारे सहा गट करून एक चर्चा घडवून आणली गेली. प्रबोधिनीचे माजी सचिव आणि महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाने हितचिंतक संमेलनाची सांगता झाली. या संमेलनास संस्था प्रतिनिधी, विविध विषयाचे मार्गदर्शक, प्रबोधिनीच्या देखभालीसाठी सेवेत असलेले सर्व कंत्राटदार इत्यादी मिळून २०० प्रतिनिधी उपस्थित होते.

रवींद्र साठे सत्कार सोहळा



रवींद्र साठे यांना सन्मानित करताना भिकूजी (दादा) इदाते

प्रबोधिनीमध्ये १९९२ पासून कार्यरत असलेले रवींद्र साठे यांची मार्च २०१८ मध्ये महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली. या निमित्ताने सत्कार समारंभ २६ मे २०१८ रोजी योजण्यात आला होता. मुंबईतील कोहिनूर मंगल कार्यालयाच्या सभागृहात योजण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्यास प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे, उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि मुंबईतील सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे अध्यक्ष भिकूजी (दादा) इदाते व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रबोधिनीचे हितचिंतक आणि रवींद्र साठे यांचे आप्तेष्ट मिळून सुमारे २०० जण या सत्कार समारंभास उपस्थित होते. प्रारंभी सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष आणि साठे यांच्याशी दोन दशकांपासून संबंधित असणारे विनोद पवार यांनी आपल्या भावना मांडल्या. रवींद्र साठे यांचा परिपूर्णतेचा आग्रह, टापटीपपणा, कुठल्याही विषयाची तयारी करणे, आरोग्याबद्दलची जाणीव व सहकाऱ्यांवर जबाबदारीतून लक्ष ठेवण्यांची त्यांची वृत्ती काही उदाहरणे देत मांडली. प्रबोधिनीत १९९८ पासून ग्रंथपाल म्हणून कार्यरत असणाऱ्या दिलीप नवेले यांनी रवींद्र साठे सहकारी, वरिष्ठ या भूमिकेतून त्यांना आलेले अनुभव व्यक्त केले. साठे यांच्या महाविद्यालयीन जीवनात गुरू असलेल्या व पूर्वी प्रबोधिनीच्या मानद संचालिका म्हणून जबाबदारी सांभाळलेल्या डॉ. अरुणा कौलगुड यांनी रवींद्र साठे कसे विकसित होत गेले, कष्ट करण्याची त्यांची वृत्ती, परिपूर्णतेच्या आग्रहापोटी करत असलेले प्रयत्न या पैलूंवर भाष्य केले. प्रबोधिनीचे उपाध्यक्ष आणि जवळजवळ ३ दशके रवींद्र साठे यांच्याबरोबर प्रत्यक्ष काम केलेले डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी अनुशासनाप्रती व त्याबाबत स्वतःशीच असणारी कठोरता, टापटीपपणा, अभ्यासू वृत्ती, सहकाऱ्यांच्या वैयक्तिक अडचणी सोडवतानाची आपुलकी, आपले मत मांडण्याची स्पष्टता या गुणांवर प्रकाश टाकला. साठेंसारखा सहकारी मिळाल्यामुळेच मी अन्य कामेही सहज करू शकलो, ही प्रांजळ भावना त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.



भिकूजी (दादा) इदाते यांनी रवींद्र साठे संघ प्रचारक असल्यापासून ते प्रबोधिनीच्या महासंचालक पदावर पोहोचेपर्यंतचा प्रवास थोडक्यात मांडला. प्रबोधिनीच्याा निर्मितीत व विकासात स्व. प्रमोद महाजन, स्व. वसंतराव पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि रवींद्र साठे यांनी प्रचारक वृत्तीने काम केले. त्यामुळेच प्रबोधिनी

आज आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्था म्हणून मान्यता मिळवू शकली, असे ते म्हणाले.

प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे सत्कार सोहळ्याचा समारोप करताना म्हणाले की, रवींद्र साठेंसारख्या असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्र पुनरुत्थानाचे कार्य केले आहे. स्वतः प्रसिद्धीच्या झोतात न राहता काम करणे ही एक तपश्चर्याच आहे. रवींद्र साठे यांच्याकडून मलाही काही शिकता येईल असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

साठे यांनी सत्काराला उत्तर देताना आपण कसे घडत गेलो हे विषद केले. आणि या वाटचालीत ज्यांनी त्यांना मार्गदर्शन केले, सांभाळून घेतले, घडवले या सर्वांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

हिंदुत्व (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम १५, १६ आणि १७ मार्च २०१९ या कालावधीत प्रबोधिनीच्या उत्तन, भाईंदर येथील ज्ञान – नैपुण्य केंद्रात पार पडला. या अभ्यासवर्गाचे उद्घाटन सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे अध्यक्ष भिकूजी(दादा)इदाते यांच्या हस्ते झाले. प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी प्रास्ताविक केले. तीन दिवसांच्या या अभ्यासवर्गाला राज्यातील ११ जिल्हे आणि मध्य प्रदेश राज्यातील असे मिळून ४२ अभ्यासक उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय राष्ट्रवादाच्या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रवादाचा म्हणजे हिंदुत्वाचा, राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करू इच्छिणाऱ्या युवा कार्यकर्त्यांसाठी यावेळी दहा विविध विषयांचा परिचय करून देण्यात आला. गेल्या १२ वर्षांपासून हा उपक्रम योजण्यात येत आहे.



शिबिराचे उद्घाटन करताना भिकूजी (दादा) इदाते

भारतीय एकात्मतेच्या निर्मितीला रामायण आणि महाभारत या महाकाव्यांनी कसे साहाय्य केले हे प्रा. अविनाश कोल्हे यांनी स्पष्ट केले. ''राज्य निर्माण करणे सोपे असते, पण राष्ट्र निर्माण करणे खूप कठीण आहे,'' असे मत 'भारतीय उपखंडातील राष्ट्रवादाचा विकास' या विषयावर बोलताना डॉ. मनीषा टिकेकर यांनी व्यक्त केले. ''लोकसाहित्य, लोकपरंपरा या बाबी लोकजीवनातील हिंदुत्वामध्ये समाविष्ट होतात. व्यवहारातील हिंदुत्व प्रविष्ट करणे म्हणजे लोकजीवनातील हिंदुत्व समजावून घेणे होय,'' असे मत रवींद्र गोळे यांनी व्यक्त केले.

याखेरीज प्रा. म. मो. पेंडसे, भाऊ तोरसेकर, अरविंद कुळकर्णी , अक्षय जोग , विराग पाचपोर आदींनीही या अभ्यास वर्गाला मार्गदर्शन केले. समारोप सत्राला दादा इदाते, प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष चित्रा फडके, विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष अशोकराव चौगुले आदी उपस्थित होते.

संवाद सभा



महाराष्ट्रातील काही प्रमुख संपादक–लेखक–वाचक व रसिकां–साठी म्हाळगी प्रबोधिनी मागील पाच वर्षापासून संवाद सभेचे आयोजन करत आहे. 'मराठी भाषा आणि संस्कृती : काल, आज आणि उद्या' हे या सर्व सभांचे समान विषयसूत्र राहिले आहे. परस्पर संवाद आणि विचार – संकल्पना, देवाणघेवाण या हेतूने मुख्यत्वे सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमात प्रतिवर्षी ३०–४० प्रतिनिधी सहभागी होत असतात. या सभेत सहभागी होणाऱ्यांमध्ये पत्रकार, कलावंत, साहित्यिक, प्रकाशक व रसिक वाचक आदींचा समावेश असतो.

संवाद सभेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार, लेखक, कवी अंबरीश मिश्र व ज्योत्स्ना प्रकाशनचे विकास परांजपे आणि प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक रवींद्र साठे यांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीला स्व. गंगाधर पानतावणे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रसिद्ध अभिनेते सचिन खेडेकर यांनी चित्रपट सृष्टीतील आपल्या वाटचालीवर दृष्टिक्षेप टाकला. ज्येष्ठ बालसाहित्यकार माधुरी पुरंदरे यांनी लेखनाबरोबरच मुलांशी संवाद साधत, चित्रे काढत बालसाहित्यातील आपली भूमिका स्पष्ट केली. लेखनाची प्रेरणा आणि आजूबाजूच्या सामाजिक–राजकीय वास्तवाकडे सर्जनशील लेखक–कलावंत कसे पाहतो यावर प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक सचिन कुंडलकर यांनी भाष्य केले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी विचार प्रवर्तक आणि मौलिक असे 'आधुनिक महाराष्ट्र धर्म' या



संवाद सभेचे उद्घाटन करताना ज्येष्ठ पत्रकार अंबरीश मिश्र

विषयावर आपले विचार मांडले.ज्येष्ठ पत्रकार रमेश पतंगे यांनी स्व. गंगाधर पानतावणे यांच्या आठवणींना उजाळा दिला. संगीत तज्ज्ञ पं. सत्यशील देशपांडे यांनी 'संगीत विचार' या विषयावर आपले विचार मांडले. संवाद सभेस विविध क्षेत्रातील ४२ नामवंतांनी सहभाग घेतला.

गुरुवार सभा

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्यावतीने गेली ३० वर्षे गुरुवार सभा हा उपक्रम अखंडपणे सुरू आहे. महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी प्रबोधिनीच्या वडाळा, मुंबई येथील चंचल कार्यालयात होणाऱ्या या उपक्रमात वर्तमान महत्त्वाच्या राष्ट्रीय,राजकीय,सामाजिक विषयावर त्या विषयातील अभ्यासकांचे/तज्ज्ञांचे व्याख्यान योजण्यात येते. अहवाल वर्षात झालेल्या गुरुवार सभेचा तपशील पुढीलप्रमाणे.



दैनंदिन जीवनात व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करताना संजय तासगावकर



राष्ट्रीय नागरिक नोंदणी अर्थात नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स (N.R.C.): एक वास्तव या विषयावर बोलताना माधव भंडारी

अ.क्र.	दिनांक	विषय	उपस्थिती	वक्ता
१.	२८ जून २०१८	अनुत्पादित कर्ज आणि बँका–वास्तव आणि उपाय	४०	विद्याधर अनास्कर
२.	२६ जुलै २०१८	युगप्रवर्तक चाणक्य	४२	आसावरी बापट
३.	३० ऑगस्ट २०१८	राष्ट्रीय नागरिक नोंदणी अर्थात नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स (N.R.C.) : एक वास्तव	३५	माधव भंडारी
४.	२ सप्टेंबर २०१८	फॉरीन फंडस् ॲन्ड इंडियन सिव्हील सोसायटी	५०	सी. सुरेन्द्रनाथ मुकुंद चितळे
५.	२५ ऑक्टोबर २०१८	अमेरिका–चीन व्यापार युद्धाचे जागतिक परिणाम	३५	मकरंद हेरवाडकर
६.	२१ फेब्रुवारी २०१९	दैनंदिन जीवनात व्यवस्थापन	२२	संजय तासगावकर
७.	२८ मार्च २०१९	हवाई हल्ले : भारताची बदलती रणनीती	२५	विजय पागे, कर्नल (निवृत्त) व्यंकटरमण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र ग्रंथालय



१९९३ साली चंचलस्मृती, वडाळा येथील सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक शरणकुमार लिंबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या ग्रंथालयाचे उद्घाटन झाले. २००० साली केशव सृष्टी येथील प्रशिक्षण संकुलात ग्रंथालयास मोठे दालन प्राप्त झाले. या ग्रंथालयास शासन मान्यता असून अभ्यासू व संशोधक कार्यकर्त्यांना उपयोगी पडतील अशी सर्व प्रकारची पुस्तके, ग्रंथ व पुस्तिका आज येथे उपलब्ध आहेत. ग्रंथालयाच्या वतीने अभ्यासकांना निवासी पाठ्यवृत्तीही देण्यात येते.

प्रबोधिनीचे हे ग्रंथालय शासनमान्य (महाराष्ट्र राज्य) असून या ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. ग्रंथालयामध्ये विपुल ग्रंथसंपदा, विविध विषयांवरील पुस्तिका, वृत्तपत्रीय कात्रणे उपलब्ध आहेत. राज्याबाहेरील अभ्यासक, वाचकही या ग्रंथालयाचा लाभ घेत असतात. ग्रंथालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील ग्रंथांचा समावेश आहे.


ग्रंथालयास अभिनेते सचिन खेडेकर यांची भेट



अहवाल वर्षात ग्रंथालयातर्फे ६ प्रबोधनात्मक, २ कार्यशाळा व ७ इतर असे १५ सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. संवाद सभा, ग्रंथालय कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा, ग्रंथ प्रकाशन, वाचन प्रेरणा दिन, वृक्ष लागवड, मराठी भाषा दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व ग्रंथ प्रदर्शन त्या उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमात केशव उपाध्ये, रमेश पतंगे, रवींद्र साठे, प्रा. अविनाश कोल्हे, स्वाती पाटणकर यांनी मार्गदर्शन केले.

अनेक अत्याधुनिक सेवा-सुविधा असलेल्या या ग्रंथालयाला अनेक सन्माननीय व्यक्तींनी ग्रंथभेटी दिल्या आहेत. या सन्माननीय व्यक्तींमध्ये दिलीप चावरे, सारंग दर्शने, श्रीकांत रांगणेकर, प्रा. टी. के. सरगर (कोल्हापूर), एन. एच. अत्रे, मे. जन. शिशिर महाजन (पुणे), जयंत गोरे (ठाणे), विजयराव भालेराव (औरंगाबाद), प्रभाकर टिकेकर, शरद काळे (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान), डॉ. कांतीलाल टाटिया (नंदुरबार), डॉ. धर्माजी बोडके (नाशिक), विश्वास देशपांडे

(जळगाव), रूपाली राक्षे (सातारा), श्रीमती शांता नारकर (देवरुख), डॉ. प्रज्ञा देशपांडे (नागपूर), विद्याधर निमकर (ठाणे), डॉ. सचिन पाचोरकर (नाशिक), वृषाली मांडे (अहमदनगर), प्रा. मधुसूदन पेंडसे (मुलुंड), जगदीशचंद्र पाटील (बुलडाणा), डॉ. मनीषा टिकेकर (बांद्रा) आणि प्रा. बी. के. हेडाऊ (नागपूर) यांचा समावेश आहे.

१७ मार्च २०१९ रोजी पुणे मराठी ग्रंथालय व ग्रंथालय भारती यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक ग्रंथालय संचालक, पदाधिकारी व कर्मचारीवृंद यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात ग्रंथपाल दिलीप नवेले यांनी 'ग्रंथालयांचे उपक्रम' या विषयावर मार्गदर्शन केले.

निवासी संशोधन पाठ्यवृत्ती

अहवाल वर्षात प्राची साठे (बोरिवली), प्रा. सचिन बनसोड (नागपूर), श्रीधर सोनराव आघाव (बीड) आणि दत्तात्रय चौधरी (धुळे) यांनी या निवासी पाठ्यवृत्ती योजनेअंतर्गत ग्रंथालयाचा लाभ घेतला.

प्रबोधिनी कर्मचारी विकास उपक्रम

४ आणि ५ ऑगस्ट २०१८ रोजी पुण्यात झालेली 'शालेय ग्रंथपाल क्षमता विकास कार्यशाळा', दि. २ ऑक्टोबर २०१८ रोजी रत्नागिरीत झालेली राजाराम मोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान 'ग्रंथालय सहाय्य योजना कार्यशाळा' आणि दि. २५ ते २७ ऑक्टोबर २०१८ पुण्यातील 'ग्रंथपाल संपन्नता कार्यशाळेमध्ये ग्रंथपाल दिलीप नवेले व दिलीप वळवी यांनी सहभाग घेतला होता.

ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० व ११ डिसेंबर २०१८ रोजी झालेल्या 'ग्रंथोत्सव २०१८'साठी प्रबोधिनीच्या ग्रंथालयाचे कर्मचारी उपस्थित होते. त्याखेरीज देवरूख येथे ५ – ६ जानेवारी २०१९ रोजी झालेले 'रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय अधिवेशन', दिनांक २ फेब्रुवारी २०१९ रोजी धुळे येथे झालेले 'स्वा. सावरकर साहित्य संमेलन', तसेच १७ फेब्रुवारी २०१९ रोजी म्हसळा येथे झालेले 'रायगड जिल्हा ग्रंथालय अधिवेशन' या कार्यक्रमांसांठीही प्रबोधिनीच्या ग्रंथालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

सार्वजनिक ग्रंथालयातील पदाधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान अनन्यसाधारण आहे. सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी वृंदाच्या सहभागातून ग्रंथालये अधिक वाचककेंद्रित, आधुनिक होण्यांसाठी २८–२९



जुलै २०१८ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते.

ग्रंथालयांचे आधुनिकीकरण, ग्रंथालयात येणाऱ्या, न येणाऱ्या वाचकांच्या गरजा, त्या पुरविण्याकरिता लागणारी साधने, त्यात झालेले बदल यांची माहिती देणे, ग्रंथालयांची उपक्रमशीलता वाढविणे या हेतूने ग्रंथपालांना सक्षम बनविणे हा या कार्यशाळेचा हेतू होता.

राज्याचे सेवानिवृत्त ग्रंथालय संचालक डॉ. बा. ए. सनान्से यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यशाळेचा राज्यातील २४ सार्वजनिक ग्रंथालयातील २४ पदाधिकाऱ्यांनी लाभ घेतला. यामध्ये एकूण सात विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. माधव

भंडारी, श्याम जोशी, डॉ. प्रतिभा गोखले, डॉ. मीना शिलेदार, गणेश वेताळ, श्रीपाल नहाता आणि ओमकार कडू या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात डॉ. प्रतिभा गोखले व ग्रंथपाल दिलीप नवेले यांनी कार्यशाळेविषयी अभिप्राय जाणून घेतले व सर्व प्रतिनिधींना प्रमाणपत्र देऊन ही कार्यशाळा संपन्न झाली.

शालेय ग्रंथपाल क्षमता विकास कार्यशाळा

शालेय शिक्षणाच्या गुणवत्तावाढीमध्ये आणि पर्यायाने विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, मानसिक विकासामध्ये शाळेच्या ग्रंथालयाचे आणि ग्रंथपालाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. हे लक्षात घेऊन २०–२१ ऑक्टोबर २०१८ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन शेखर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेत १५ शालेय ग्रंथपाल सहभागी झाले होते. कार्यशाळेत शालेय ग्रंथालय : काल, आज आणि उद्या, ग्रंथपालांची भूमिका व जबाबदारी, संवाद कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, शालेय ग्रंथालयात संगणकाचे महत्त्व आणि ग्रंथांचे जतन आणि संवर्धन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.



शेखर कुलकर्णी, डॉ. सुषमा पौडवाल, स्वाती महाळंक, रवींद्र साठे, संजय सकपाळ, माधव शिरवळकर, ओमकार कडू आणि श्याम जोशी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेची संकल्पना उत्तम, सर्वसमावेशक होती. ग्रंथपालाच्या कार्याविषयी सखोल ज्ञान मिळाले. विषयांची मांडणी खूपच छान व व्यवस्थित होती. अशा कार्यशाळेमुळे आपण स्वतःमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणू शकतो. शालेय ग्रंथपालांसाठी हा एक चांगला उपक्रम राबविण्यात आला असल्यामुळे या कार्यशाळेत बरेच काही शिकता आले. अशा कार्यशाळा नियमितपणे घेण्यात याव्यात, अशा प्रतिक्रिया सहभागींनी नोंदविल्या.

ग्रंथपाल दिलीप नवेले यांनी सर्व प्रतिनिधींचे आभार मानले व ही कार्यशाळा संपन्न झाली.

ग्रंथालयातील साहित्याची सध्याची उपलब्धता पुढीलप्रमाणे –		
अ.क्र.	**ग्रंथालयीन साहित्य प्रकार**	**नोंद साहित्य**
१.	ग्रंथ (मराठी, हिंदी व इंग्रजी)	१६१५९
२.	पुस्तिका (विविध विषयांवरील संदर्भ पुस्तिका)	३६१२
३.	दुर्मीळ वृत्तपत्रीय कात्रणे	९००००
४.	ध्वनिफिती	७०९
५.	चित्रफिती	२२७
६.	सीडीज	७५२
७.	दुर्मीळ वृत्तपत्रे	६३
८.	नकाशे	१२
९.	मासिके व नियतकालिके	१११०



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

६
ज्ञान -नैपुण्य
केंद्र
उपक्रम



महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यान देताना प्रा. अविनाश कोल्हे

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर २०१८ रोजी प्रबोधिनीच्या उत्तन येथील कार्यसंकुलात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 'भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी' या विषयावर प्रा. अविनाश कोल्हे यांनी आपले विचार मांडले. भारतीय राज्यघटनेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीसहित त्यामधील निर्मिती प्रक्रियेतील अडीअडीचणीवर मात करून डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी न घाबरता, न डगमगता भारतीय राज्यघटना कशी पूर्ण केली यावर प्रा. कोल्हे यांनी प्रकाश टाकला. या व्याख्यानास प्रबोधिनीतील कर्मचाऱ्यांसह परिसरातील महाविद्यालयातील १३० विद्यार्थी उपस्थित होते.

प्रमोद महाजन पुण्यतिथी कार्यक्रम

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या उत्तन येथील कार्यालयामध्ये प्रमोद महाजन यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवार, दि.३ मे २०१८ रोजी 'आपण अनुभवलेले प्रमोदजी' या विषयावर भाजपा महाराष्ट्र प्रदेशचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी उपस्थितांशी संवाद साधला. प्रमोदजी यांच्याबरोबर काम करताना आलेले अनुभवही त्यांनी यावेळी सांगितले. प्रमोदजी आयुष्याच्या सुरुवातीला गरिबीशी, अन्यायाच्या विरोधात लढले आणि राजकारणात शत्रूच्या विरोधात लढत राहिले, असे श्री. उपाध्ये यांनी सांगितले. प्रमोद महाजन सहकाऱ्यांची मते अजमावण्यात कधीही कमीपणा मानत नसत, सहकाऱ्यांच्या मतांचा त्यांनी नेहमीच आदर केला. भव्य स्वप्ने पाहण्याची क्षमता त्यांच्यात होती. ते मुळातच योद्धे राजकारणी होते. त्यांच्या संपर्कात असणाऱ्या प्रत्येकाला पुढे घेऊन जाण्याची उत्तम कला त्यांना अवगत होती. प्रमोदजींना राजकारणातील जिगरबाज नेतृत्व म्हणून ओळखले जात असे, अशा शब्दात उपाध्ये यांनी महाजन यांचा गुणगौरव केला. अशा अनेक गुणांचा संचय प्रमोदजीमध्ये होता. आपणही त्यांचे काही गुण आचरणात आणावेत, असे आवाहन उपाध्ये यांनी केले. यावेळी प्रबोधिनीचे तसेच विविध आस्थापनांचे एकूण ९० कर्मचारी उपस्थित होते.



सुरक्षाविषयक प्रशिक्षण

प्रबोधिनीच्या भाईंदर येथील संकुलातील सर्व कर्मचाऱ्यांसाठी व एजन्सीच्या कर्मचाऱ्यांसाठी गुरुवार, ४ मे २०१८ रोजी अग्निशमन यंत्रणेचा वापर, आगीवर नियंत्रण, आग लागलेल्या ठिकाणावर असलेल्या व्यक्तीची सुरक्षा याबाबत एस.के. कंपनीचे शेर बहादूर यादव व अपेक्षा रावत यांनी प्रशिक्षण दिले. यामध्ये एकूण ५७ जण सहभागी झाले होते.



नेत्रचिकित्सा शिबिर

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी व जन्मदा आय अँड मेडिकल फाऊंडेशन, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार ७ मे २०१८ रोजी केशव सृष्टी परिसरातील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, रामरत्न विद्यामंदिर विद्यालय, उत्तन वनौषधी संशोधन संस्था, गौशाला परिषद, उत्तन कृषी संशोधन संस्था व इतर संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी नि:शुल्क नेत्र चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराच्या उद्घाटन समारंभात मिलिंद चाळके यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद बेटावदकर यांनी डॉ. विजय धारवाडकर यांचे स्वागत व सत्कार केला. जन्मदा फाऊंडेशनचे अध्यक्ष नेत्रतज्ज्ञ डॉ. विजय धारवाडकर यांनी डोळ्यांची काळजी कशी घ्यावी, डोळ्यासाठी पोषक आहार कोणता घ्यावा, भ्रमणध्वनी व संगणकावर काम करताना कोणती विशेष काळजी घ्यावी या विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या शिबिरात एकूण १४० कर्मचाऱ्यांची नेत्रतपासणी करण्यात आली. त्यातील ३० कर्मचाऱ्यांना 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर सवलतीच्या दरात चष्मे देण्यात आले. तसेच ९० कर्मचाऱ्यांना मोफत औषधे देण्यात आली. जन्मदा फाऊंडेशनचे सचिव मिलिंद धारवाडकर यांनी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे व महासंचालक रवींद्र साठे यांचे आभार मानले व यापुढेही रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या अशा लोकोपयोगी उपक्रमात नेहमीच सहकार्य करू, अशी ग्वाही दिली.

आदरांजली...!



ॲड. चिंतामण वनगा



यशवंत ठकार

या अहवाल वर्षात प्रबोधिनीच्या संशोधन विभाग सक्षम व विकसित करण्यास ज्यांनी बहूमोल मदत केली ते पुणे येथील सामाजिक संशोधन यशवंत ठकार तसेच प्रबोधिनीच्या समितीचे माजी सदस्य व भा.ज.पा.चे खासदार ॲड. चिंतामण वनगा या दोघांचे अहवाल वर्षात दु:खद निधन झाले. प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने यांना भावपूर्ण श्रध्दांजली...!

अटल प्रतिभा पोषण केंद्र



देशाच्या कानाकोपऱ्यातील नव उद्योजकीय प्रतिभेला चालना देणे आणि त्यातील उद्योगनिर्मितीद्वारे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, या व्यापक हेतूने केंद्र सरकारने अटल प्रतिभा पोषण केंद्र अर्थात अटल इनक्युबेशन सेंटर ही संकल्पना अस्तित्वात आणली. त्याला अनुसरून प्रबोधिनीने आजवरच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आणि प्रबोधिनीच्या केशव सृष्टी संकुलात अटल प्रतिभापोषण केंद्राची स्थापना झाली. त्याचे उद्घाटन २० जानेवारी २०१८ रोजी नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीवकुमार आणि अटल इनोव्हेशन मिशनचे संचालक आर. रमणन यांच्या हस्ते झाले. प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे, उपाध्यक्ष आणि राज्यसभेचे खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, प्रबोधिनीच्या व्यवस्थापन समितीचे सचिव आमदार मंगल प्रभात लोढा आणि महासंचालक रवींद्र साठे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. ''अटल प्रतिभापोषण केंद्र हा प्रबोधिनीच्या ३५ वर्षांच्या वाटचालीतील एक मैलाचा दगड असून संस्थेच्या या पुढाकारामुळे विविध उपक्रमांना चालना मिळेल आणि सामाजिक परिवर्तनाला गती मिळेल,'' असे प्रतिपादन डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी या वेळी केले.

या केंद्राच्या माध्यमातून प्रबोधिनी नवउद्योजकांना सल्ला आणि प्रशिक्षण देण्याचे काम करणार असून, यांत माहिती–तंत्रज्ञान आणि सामाजिक उद्योजकता या क्षेत्रांचा समावेश आहे. शेती आणि उद्योजकतेच्या माध्यमातून स्टार्ट अप्सना प्रेरणा देणार आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण, स्टार्टअप्ससाठी योजना तयार करणे, त्या गुंतवणूक सुलभ बनवणे, त्यासाठीचे नेटवर्क तयार करणे आणि याद्वारे अनुभवी कार्यसंघ तयार करणे आदी उद्दिष्टे या माध्यमातून साध्य करण्याचा प्रयत्न आहे.

उदय वोकावाल या केंद्राचे मुख्य कार्यकारी आधिकारी म्हणून काम पाहात आहेत.



अटल प्रतिभा पोषण केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीवकुमार यांचा सत्कार करताना प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे आणि उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे

ATAL INCUBATION CENTRE

ए.आय.सी. - कल्पना ते कृती कार्यशाळा

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या अटल इनक्युबेशन सेंटर अर्थात अटल प्रतिभापोषण केंद्राचा पहिला प्रशिक्षण वर्ग ८ व ९ डिसेंबर २०१८ रोजी संपन्न झाला. केशव सृष्टी ग्रामविकास विभागाअंतर्गत चालणाऱ्या या उपक्रमाद्वारे तीन तालुक्यांच्या युवकांचे प्रशिक्षण रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या उत्तन येथील संकुलात झाले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी चे कार्यकारी प्रमुख (प्रशासन व प्रकल्प) रवी पोखरणा यांचा हस्ते उदघाटन झाले. यावेळी अमित टूटेजा, विमल केडिया उपस्थित होते वाडा, जव्हार आणि विक्रमगड या तालुक्यातील ४० प्रशिक्षणार्थी मिळून एकूण ७० प्रशिक्षणार्थी आणि मुंबईच्या उपनगरातील काही मार्गदर्शक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. या वर्गाच्या प्रारंभी अमित टूटेजा यांनी प्रशिक्षणार्थींचे विविध गट केले. आणि सर्व गटांना तिन्ही तालुक्यांमधील कोणतेही एक गाव निवडून गावातील समस्येबद्दल विचारविनिमय करण्यास सांगण्यात आले.

या विचार विनिमयासाठी बऱ्याच प्रकारचे तक्ते वापरले गेले. तक्त्यांच्या साहाय्याने समस्या लिहून त्याची निवड कोणत्या पद्धतीने करायची आणि समस्येला कोणत्या वर्गात समाविष्ट करता येईल हे त्यामधून प्रशिक्षणार्थींना शिकविण्यात आले. या व्यतिरिक्त त्या समस्येबाबत खोलवर विचार कसा करायचा आणि त्यामधून स्पष्ट होणारे विचार करण्याचे प्रकार याबाबत माहिती देण्यात आली.



प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन सत्रात (डावीकडून) उमेश मोरे, विमल केडिया, अमित टूटेजा आणि रवी पोखरणा

दुसऱ्या दिवशी त्या समस्येवरील उपाययोजना काय असू शकते याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आणि विचार करण्यासाठी लागणाऱ्या दृष्टिकोनाबद्दल माहिती दिली गेली.

रवी पोखरणा यांनी इनक्युबेशन सेंटरबाबत माहिती दिली. उदय वांकावाला यांनी इनक्युबेशन सेंटर काय सहाय्य करू शकते याबाबत माहिती दिली. प्रशिक्षण वर्गाचा समारोप प्रशिक्षणार्थींनी भरविलेल्या प्रदर्शनाने आणि त्यांच्या अनुभव कथनाने करण्यात आला.

इन्स्टिट्यूट ऑफ इनक्लूझिव्ह गव्हर्नन्स (IIGH), हैद्राबाद

डिसेंबर २०१७ पासून हैद्राबाद येथे प्रबोधिनीच्या माध्यमातून आय्.आय्.जी.एच्. कार्यान्वित झाली. याच्या वतीने अहवाल वर्षात दोन विशेष कार्यक्रम झाले. दि. २४, २५ सप्टेंबर २०१८ रोजी सार्वजनिक जीवनात नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींच्या निजी साहाय्यकांसाठी दोन दिवसांचे प्रशिक्षण योजण्यात आले. यांत ४२ प्रतिनिधी सहभागी झाले होते. कार्यालयीन व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास, माहिती–तंत्रज्ञानाचा उपयोग इ. विषयांचा तज्ज्ञ व्यक्तींकडून चर्चा करण्यात आली.

एन.सी.इ.आर्.टी. चे सदस्य पी. मुरलीमनोहर यांनी कार्यशाळेचा समारोप केला. आय.आय.जी.एच.च्या वतीने २९ ऑक्टोबररोजी नोकरी–व्यवसायाच्या ठिकाणी महिलांचे होणारे लैंगिकशोषण टाळण्यासाठीचा कायदा (POSH Act, 2013) या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा योजण्यात आली होती.

सदर विषयावर १४२ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. ज्यांत शैक्षणीक व व्यावसायिक संस्था, कामगार संघटना, सरकारी कार्यालयातील महिला प्रतिनिधी व कार्यकर्त्यांचा समावेश होता.

हैद्राबाद विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाच्या प्रमुखमीनाहरिहरन यांनी कार्यशाळेचे उद्घाटनकेलेतर राष्ट्रीय महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा ललिता कुमार मंगलम यांनी समारोप केला.

कार्यशाळेत उषा सिंग, ऐक्का चंद्र शेखरजी, विजया देवी, माधवी देवी, सागर नेवासे या मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

उज्ज्वला योजना मूल्यमापन



ग्रामीण जीवनात उज्ज्वला योजनेचे योगदान या विषयावरील राष्ट्रीय परिषद प्रबोधिनीच्या वतीने मुंबई मध्ये आयोजित करण्यात आले होती. या परिषदेच्या अगोदर प्रबोधिनीच्यावतीने महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात काही ग्रामीण व शहरी परिवारातील उज्वला योजनेतील लाभार्थी महिलांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखतीद्वारे योजनेच्या कार्यवाहीबद्दलचे सर्वेक्षणाच्या माध्यमातून सर्वंकष मूल्यमापन सप्टेंबर २०१८ मध्ये करण्यात आले. त्यासाठी उल्हासनगर व ठाणे तालुक्यातील ८१० लाभार्थी महिलांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या सर्वेक्षणात उज्वला योजनेमुळे महिलांना होणारे लाभ, त्यांचा वाचणारा वेळ व त्याचे व्यवस्थापन, आरोग्य, खर्च बचत, आत्मसन्मान इ. मुद्द्यांचा उहापोह करण्यात आला.

या मूल्यमापनात लाभार्थींकडून आलेल्या सूचना व अभिप्रायांच्या आधारे अहवाल तयार करण्यात आला तो केंद्रीय मंत्री, धर्मेंद्र प्रधान यांना प्रबोधिनीच्यावतीने सुपूर्द करण्यात आला.

बालकांशी गैरवर्तन व लैंगिक शोषणविरोधातील उपाययोजना अभ्यास

आज आपल्या देशात बालकांचे लैंगिक शोषण व त्यांच्या शारीरिक छळाच्या घटना दुर्दैवाने घडत आहेत. आदिवासी भागातील सरकारी आश्रमशाळा, जवाहार नवोदय विद्यालय (जे.एन.व्ही.) आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये (के.जी.बी.व्ही.) सुध्दा यांस अपवाद नाहीत.

या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय बालहक्क आयोगाच्या सहयोगाने म्हाळगी प्रबोधिनीने अहवाल वर्षात एक अभ्यास प्रकल्प हाती घेतला. यांत २२४ सरकारी आश्रमशाळा, २९ जे. एन. व्ही. व १८० के. जी. बी. व्ही. असे मिळून ४३३ शाळांमधील पीडित बालकांच्या प्रकरणांचा अभ्यास करण्यात आला.

बालके शिकत असलेल्या शाळा व त्यांच्या निवासस्थानी त्यांच्याशी होणारे गैरवर्तन व शारीरिक व लैंगिक शोषण–विरोधात उपाय योजना, ते रोकण्यासाठी सुरक्षितता, त्यातील कमतरता याचा अभ्यास करण्यात आला असून अभ्यासात शिफारशींचाही समावेश आहे. अहवाल लेखनाचे काम अंतिम टप्प्यात असून पुढील काळात तो संबंधित सरकारी विभागात सादर करण्यात येईल.

रुपै कार्ड मूल्यांकन अभ्यास

२०१४ साली मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर जन-धन-योजनेअंतर्गत कोट्यावधी लोकांची खाती उघडण्यात आली. या योजनेतील लाभार्थींना बँकेच्या व्यवहारासाठी रुपै कार्डही देण्यात आले. प्रबोधिनीच्या वतीने या सुविधेच्या परिणामकारतेचा मूल्यांकन अभ्यास करण्याकरिता एक संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

नाबार्डच्या संशोधन आणि विकासनिधीने यांस मदत केली असून कलकत्ता येथील सोलेस संस्थेचे तरुण संशोधक आदर्श कटरुगा हे बिहार व उत्तर प्रदेशातील ५०० लाभधारकांचा अभ्यास करणार आहेत.

पं. दीनदयाळ दर्शन प्रकल्प भूमीपूजन



थोर विचारवंत आणि एकात्म मानवदर्शनचे प्रणेते प.दीनदयाळ उपाध्याय यांची सर्व देशात जन्मशताब्दी साजरी करण्यात आली. या निमित्ताने केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या मदतीने म्हाळगी प्रबोधिनीत पं.दीनदयाळ उपाध्याय दर्शन प्रकल्प होणार आहे. या प्रकल्पाच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम २६ ऑक्टोबर, २०१८ रोजी झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनराव भागवत यांची यांस मुख्य उपस्थिती होती. सरकार्यवाह भय्याजी जोशी, सहसरकार्यवाह डॉ.कृष्ण गोपाल हे ही यावेळी उपस्थित होते.

म्हाळगी प्रबोधिनीच्या केशव सृष्टी येथील प्रशिक्षण संकुलात हा प्रकल्प होणार असून यांत पं.दीनदयाळजींचे जीवन व विचार दर्शविणारे एक संग्रहालय व प्रदर्शनी कक्ष होणार आहे.

कौशल्य विकास प्रशिक्षण

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने राष्ट्रीय कौशल्य विकास प्राधिकरणाशी २०१६ मध्ये सामंजस्य करार केल्यानंतर, जिल्हा कौशल्य विकास केंद्र, कल्याण येथे कौशल्य विकास उपक्रमांची अंमलबजावणी चालू ठेवली. यावर्षी प्रबोधिनीने १. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान २. दीनदयाल अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी रोजगार अभियान या दोन मोठ्या योजनांमध्ये सहभाग घेतला. या योजनांअंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा तपशील पुढीलप्रमाणे :

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान			
कार्य-भूमिका	**बॅच संख्या**	**कालावधी**	**प्रशिक्षित उमेदवारांची संख्या**
लेखांकन	२	४ महिने	४२
साहाय्यक सौंदर्य चिकित्सक	१	२ महिने	२३
एकूण	३		६५
दीनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी रोजगार अभियान			
कार्य-भूमिका	**बॅच संख्या**	**कालावधी**	**प्रशिक्षित उमेदवारांची संख्या**
लेखांकन	३	४ महिने	६८
साहाय्यक सौंदर्य चिकित्सक	१	२ महिने	३०
सौंदर्य चिकित्सा व हेअर स्टाईलिंग स्तर – १	१	६ महिने	२७
एकूण	५		१२५

शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी...



रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेबरोबर (युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक अँड सोशल कौन्सिल – इकोसॉक) कार्यरत असून स्वयंसेवी संस्थांच्या गटात २००६ पासून विशेष सल्लागार म्हणून प्रबोधिनीला मान्यता मिळाली आहे. या भूमिकेतून प्रबोधिनी देशाच्या सर्वंकष विकासाच्या दृष्टीने काय करता येईल, विकास प्रक्रियेला बाधा आणणारे, जागतिक पातळीवर भेडसावणारे प्रश्न आणि सामोरी येणारी आव्हाने यांचा राष्ट्रीय पातळीवर प्रभावीपणे सामना करता यावा, म्हणून अभ्यासकांशी चर्चा करणे, त्याबाबतचा आराखडा तयार करणे इत्यादी जबाबदाऱ्या अनेक वर्षे पार पाडते आहे.

याच भूमिकेतून प्रबोधिनीने देशापुढील शाश्वत विकासाची उद्दिष्टे कोणती, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कालबद्ध स्वरूपाचा निश्चित कार्यक्रम काय असावा आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी नेमकी प्रक्रिया अथवा पद्धती काय आणि कशी असावी, याबाबत विकास क्षेत्रातील अभ्यासक व्यक्ती आणि संस्था, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी विस्तृत चर्चा केली. यामधूनच शाश्वत विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आणि संयुक्त राष्ट्रांच्या संपर्कात सूचीबद्ध असलेल्या संस्थांपर्यंत पोहोचण्यासाठी एका समन्वित व्यासपीठाची गरज असल्याचे स्पष्ट झाले.

९ जुलै ते १८ जुलै २०१८ या कालावधीत संयुक्त राष्ट्रांच्या न्यूयॉर्क येथील मुख्यालयात संघटनेच्या उच्चस्तरीय राजकीय व्यासपीठाच्या बैठकीत नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार सहभागी झाले होते. त्यावेळी त्यांना भारतासाठी सद्यस्थितीत सर्वाधिक महत्त्वाची असलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि त्यांचा विकास या विषयावर प्रकाश टाकणे आणि हा विषय जागतिक मंचाच्या दृष्टोत्पत्तीस आणणे अत्यंत गरजेचे आहे, असे वाटले. त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघातील भारताचे कायम प्रतिनिधी (निवृत्त)असोक मुखर्जी यांच्या मार्गदर्शनानुसार प्रबोधिनीने या कामात पुढाकार घेतला आणि या विषयावरील



शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी...या विषयावर आयोजित नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत सहभागी (डावीकडून) रवी पोखरणा आणि रवींद्र साठे

नियोजित गोलमेज बैठकीसाठी (राऊंड टेबल मीट) संकल्पना आणि त्याचा आराखडा निश्चित केला. ही बैठक १३ मार्च २०१९ रोजी नवी दिल्ली येथे नीती आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. देशाच्या विभिन्न भागात तळागाळातील लोकांसाठी, वंचितांच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या आणि एका अर्थाने विकासप्रक्रियेतील खरेखुरे भागीदार ज्यांना म्हणता येईल अशा स्वयंसेवी संस्था प्रबोधिनीने शोधून काढल्या आणि त्यांना या बैठकीत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले. प्रबोधिनी आणि नीती आयोगाने संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या या अर्धदिवसीय गोलमेज बैठकीचे सूत्र 'शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जनतेचे सक्षमी–करण आणि सर्वसमावेशक, समानतेच्या माध्यमातून या विकास प्रक्रियेतील त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे ' असे होते. तेरा संस्थांच्या २६ प्रतिनिधींनी त्यामध्ये सहभाग घेतला. त्यात १७ पुरुष आणि महिला प्रतिनिधींचा समावेश होता. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीला चालना देणाऱ्या आणि ही उद्दिष्टे गाठण्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे हे सर्व प्रतिनिधी होते. शाश्वत विकासाच्या महत्त्वपूर्ण अशा पाच उद्दिष्टांवर या परिषदेत प्रकाश टाकण्यात आला. ती पुढीलप्रमाणे, १. उपासमारीपासून मुक्तता, २. उत्तम आरोग्य आणि निरामय जीवनशैली, ३. गुणवत्तापूर्ण शिक्षण, ४. लिंगसमानता, ५. स्वच्छता आणि स्वच्छ पाणी.

बैठकीच्या प्रारंभी प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी या बैठकीची पार्श्वभूमी विषद केली आणि पुढील रूपरेषा स्पष्ट केली. त्यानंतर असोक मुखर्जी यांनी आपले विचार मांडले. शाश्वत विकासाची उद्दिष्टे, त्यांचा क्रमाक्रमाने होत असलेला विकास आणि या परिस्थितीत जागतिक पातळीवर भारताची भूमिका इत्यादीबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार यांचे यावेळी बीजभाषण झाले. भारतात शाश्वत विकासाची उद्दिष्टे यशस्वीरीत्या गाठण्यासाठी पोषण आणि त्याच्याशी संबंधित बाबींवर प्रामुख्याने भर द्यावा लागेल, असे ते म्हणाले. शाश्वत विकासाची ही उद्दिष्टे सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी, त्यातील ध्येयांशी आणि आकाक्षांशी निगडीत असल्याने या उद्दिष्टांविषयी देशातल्या तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचून जाणीव – जागृती करावी लागेल, असेही त्यांनी नमूद केले.

प्रबोधिनीचे कार्यकारी प्रमुख (प्रशासन आणि कार्यक्रम) यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, दोन मुख्य हेतू मनाशी बाळगून या बैठकीचे आयोजन करण्यात आले. एक म्हणजे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संस्थात्मक पातळीवर केल्या गेलेल्या कामाचा आढावा घेणे आणि दुसरे म्हणजे डॉ. राजीवकुमार यांनी नमूद केल्याप्रमाणे, याच उद्दिष्टपूर्तीसाठी सरकारकडून केल्या गेलेल्या कामाचे मूल्यमापन करणे. या दोन्ही बाबींचा आढावा घेण्यासाठी ही बैठक संस्था आणि नीती आयोग या दोन्ही घटकांसाठी महत्त्वाची आणि उपयुक्त आहे. यानंतर बैठकीत सहभागी झालेल्या संस्थांच्या प्रतिनिधींनी आपण करत असलेल्या कामाबाबतचे सादरीकरण केले. या कामातील अनुभव आणि मिळालेली शिकवणही त्यांनी सांगितली. या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रबोधिनीतर्फे केले जाणारे प्रयत्न आणि योजले जाणारे उपक्रम यांचीही माहिती यावेळी देण्यात आली. नीती आयोगातर्फे याबाबतचे त्यांचे अनुभव आणि निरीक्षणे यांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामधून अनेक नवे विचार पुढे आले. अशा संस्थांची नियमित स्वरुपात त्रैमासिक बैठक घ्यावी. त्यातून या कामकाजाचा आढावा घेत नव्या योजना

आणि येणाऱ्या अडचणी यावर चर्चा केल्यास शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने टाकलेले ते एक महत्त्वाचे पाऊल असेल, अशी सूचना डॉ. राजीव कुमार यांनी केली. अत्यंत सकारात्मक वातावरणात या बैठकीचा समारोप झाला.

पुढील वर्षी जुलैमध्ये संयुक्त राष्ट्रांचे मुख्यालय न्यूयॉर्क इथे होणाऱ्या याच सूत्रावर आधारित परिषदेमध्ये सहभागी होण्याची संधी प्रबोधिनीला मिळाली आहे. आगामी काळात अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर नीती आयोगाबरोबर काम करण्याचा प्रबोधिनीचा मानस आहे.

भारत-चीन संस्थात्मक अनुबंध

प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे चीन मधील हैनान इन्स्टिट्यूट फॉर वर्ल्ड वॉच आणि शांघाय येथील ॲकॅडमी फॉर वर्ल्ड वॉच यांच्या निमंत्रणावरुन शांघाय येथे मे-२०१८ मध्ये व्याख्यानासाठी जाऊन आले होते. त्यावेळी त्यांनी सदर संस्थेचे निवडक संशोधक व फुदान विद्यापीठातील काही प्राध्यापकांसमोर ''भारतातील सार्वत्रिक निवडणूक -२०१८''या विषयी सादरीकरण केले. त्यावेळच्या प्रवासात साठे यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली व त्यातून दोन्ही संस्थांच्यावतीने संस्थात्मक संबंध वाढवून उभय संस्थांच्या वतीने एकमेकांच्या देशात अभ्यासगट पाठविण्याचे ठरले. त्यानूसार भारतातील एक अभ्यासगट दि. २७ नोव्हेंबर २०१८ ते २ डिसेंबर २०१८ रोजी शांघाय येथे जाऊन आला. प्रबोधिनीचे प्रशासन विभागाचे कार्यकारी प्रमुख रवी पोखरणा यांनी अभ्यासगटाचे नेतृत्व केले. या अभ्यास गटात ॲड. रणजित सांगळे, सुरज चौधरी, मिलिंद धारवडकर (महाराष्ट्र), डॉ. दिव्या गुप्ता (इंदूर), अंबर स्वामी (दिल्ली), संदीप मावा (श्रीनगर) हे अन्य सदस्य होते. अभ्यासगटास ॲकॅडेमी फॉर वर्ल्ड वॉच आणि शांघाय इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल स्टडीज या संस्थांचे संशोधक, विचारक व तज्ज्ञ मंडळींशी आंतरक्रिया करण्याची संधी प्राप्त झाली. या निमित्ताने शांघाय येथील प्राचीन बौद्ध मंदिर व अन्य विकासकामे अभ्यासगटाने बघितली. ए. डब्लू. डब्लू. चे अध्यक्ष लुई बो, उपाध्यक्ष यू झिआन डॉग, संशोधक झियांग जियांग, सहसंचालक डॉ. लीन यांच्या सहकार्याने हा अभ्यासदौरा यशस्वी झाला.

चित्रपट प्रदर्शन आणि मुक्तसंवाद

दरवर्षी ३० नोव्हेंबर हा दिवस जगभर ज्यू विस्थापित दिवस म्हणून पाळण्यात येतो. विसाव्या शतकात याच दिवशी ज्यू नागरिकांना आपल्या मायाभूमीमधून विस्थापित व्हावे लागले. त्याची स्मृती म्हणून हा दिवस आहे. त्यानिमित्त यावेळी सलग दुसऱ्या वर्षी इस्राईलच्या मुंबईमधील दूतावासातर्फे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या सहकार्याने चित्रपट प्रदर्शन आणि त्यानंतर मुक्तसंवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ४ डिसेंबर १८ रोजी झालेल्या या कार्यक्रमात 'शॅडो इन बगदाद' हा चित्रपट दाखविण्यात आला. त्यानंतर या चित्रपटाच्या निर्मात्या लिंडा मेन्यूहीन यांच्याबरोबर चर्चा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला विद्यार्थीवर्ग, ज्यू समाजातील नागरिक, दूतावासातील अधिकारी असे १५०



प्रेक्षक उपस्थित होते. त्यांनी या मुक्तसंवादात मोकळेपणाने सहभाग घेतला. हा कार्यक्रम चेंबूर इथल्या विवेकानंद शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज इथे पार पडला.

संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे.



सस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे यांच्यातर्फे एप्रिल २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीत एकूण आठ प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. त्याची माहिती पुढीलप्रमाणे.

♦ पदाधिकारी – कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर –

वृत्तपत्र हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. बदलत्या काळात या क्षेत्रातील स्पर्धाही वाढत चालली आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा सामना वृत्तपत्र विक्रेत्यांनाही करावा लागतो. हे लक्षात घेऊनच महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी संस्थेच्या उत्तन येथील केशव–सृष्टी संकुलात ६, ७ व ८ एप्रिल १८ या कालावधीत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यकर्त्यांना संघटनेची संकल्पना समजावून सांगणे, त्यांचा कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करणे, कामात व्यावसायिकता आणतानाच विकासाभिमुखता बाणवणे, त्यासाठी त्यांची प्रशासकीय कौशल्ये,संघबांधणी आणि नेतृत्वक्षमता विकसित



कार्यशाळेत सहभागी वृत्तपत्र विक्रेते

करणे इत्यादी उद्देश या शिबिराच्या संयोजनामागे होते. त्यादृष्टीने सहभागींना मार्गदर्शन करणारी व्याख्याने झाली. संस्थेचे मूल्यमापन, निधी संकलन, माध्यम व्यवस्थापन इत्यादी विषयांवर अरविंद रेगे, श्रीराम पटवर्धन, विवेक अत्रे, मकरंद जोशी, सचिन साळुंखे, अनिल पाटील आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या शिबिरात ४० जण सहभागी झाले होते.

♦ शिक्षक क्षमता विकास प्रशिक्षण कार्यक्रम –

आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षकांना त्यांची भूमिका आणि जबाबदारी समजावून सांगणे, अध्यापन आणि अध्ययन प्रक्रियेमध्ये आधुनिकता आणण्यासाठी त्यांची मनोभूमिका तयार करणे, कामाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातील सकारात्मकता वाढविणे आणि एकूण क्षमता विकसित करणे इत्यादी उद्देशाने रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली एज्युकेशन सोसायटीच्या ए. जी. हायस्कूलच्या शिक्षकांसाठी दोन दिवसांचा क्षमता विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील ९० शिक्षक यामध्ये सहभागी झाले होते. व्यक्तिमत्त्व विकास, वार्षिक नियोजन, स्वयंविश्लेषण, संवाद कौशल्ये



दापोली येथील कार्यक्रमात (डावीकडून) राहुल टोकेकर,श्रीराम माजलेकर, डॉ. प्रसाद करमरकर आणि नीलिमा देशमुख

इत्यादी विषयांवर विवेक अत्रे, जगदीश इंदलकर, श्याम भुर्के आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दापोली एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्रीराम माजलेकर, कार्यवाह डॉ. प्रसाद करमरकर आणि नीलिमा देशमुख यावेळी उपस्थित होते.

♦ शिक्षक नेतृत्व विकास कार्यशाळा –

मुंबईमधील डोंबिवली इथल्या टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेतर्फे १५ –१६, १७ जून २०१८ या कालावधीत शिक्षकांसाठी नेतृत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. शिक्षकांचा क्षमता विकास घडवून त्यांच्यातील नेतृत्व गुण वाढीस लावणे, अध्यापनाच्या नावीन्यपूर्ण पद्धती,



डॉ. मीना शिलेदार

सर्वंकष मूल्यमापन, संघबांधणी, नातेसंबंध इत्यादी विषयांवर भावना लेले, जगदीश इंदलकर, भाऊसाहेब घाडगे, डॉ. मीना शिलेदार, स्वाती महाळंक आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. अडीच दिवसांच्या या कार्यशाळेत प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील ६१ शिक्षक सहभागी झाले होते. संस्थेच्या अध्यक्षा डॉ.



मार्गदर्शन करताना डॉ. शुभदा जोशी

शुभदा जोशी, कार्याध्यक्ष श्रीकांत पावगी, कार्यवाह डॉ. महेश ठाकूर आणि आशीर्वाद बोंद्रे यावेळी उपस्थित होते.

♦ शालेय ग्रंथपाल संपन्नता कार्यशाळा –

शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये ग्रंथालय हा एक महत्त्वपूर्ण आणि अविभाज्य घटक आहे. विद्यार्थ्यांना वाचनाला उद्युक्त करण्यासाठी शाळेतील ग्रंथालये अद्ययावत असणे गरजेचे आहे आणि ग्रंथपालाचे व्यक्तिमत्त्वही संपन्न असणे आवश्यक आहे. मात्र या ग्रंथपालांच्या क्षमता आणि कौशल्य विकासासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. हे लक्षात घेऊनच पुणे केंद्राच्या वतीने शालेय ग्रंथपाल संपन्नता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ४ आणि ५ ऑगस्ट १८ या कालावधीत ही कार्यशाळा पार पडली. व्यक्तिमत्त्व विकास, वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी विविध उपक्रम, संवाद कौशल्ये, ग्रंथालय आधुनिकीकरणासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग, शालेय



रवींद्र साठे, रवी पोखरणा, स्वाती महाळंक यांच्यासह नेतृत्व विकास कार्यशाळेतील सहभागी

स्वरुपाचा उपक्रम प्रथमच झाल्याचेही अनेक ग्रंथपालांनी आवर्जून नमूद केले. या कार्यशाळेत पुणे, मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, सांगली, कोल्हापूर, अकोला, रायगड या जिल्ह्यांमधील ३३ शैक्षणिक संस्थांच्या ४० शाळांचे ४३ ग्रंथपाल सहभागी झाले होते.

♦ नेतृत्व विकास कार्यशाळा

– समाजाच्या विविध स्तरातील आणि क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींच्या नेतृत्व विकासासाठी सजग प्रयत्न म्हणून नेतृत्व विकास कार्यशाळा आयोजित करणे हे प्रबोधिनीच्या मूलभूत उद्दिष्टांपैकी एक आहे. त्यातही समाजातील युवावर्गासाठी असे उपक्रम राबविण्यावर प्रबोधिनीचा भर असतो. म्हणूनच संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्रातर्फे ही कार्यशाळा दरवर्षी आयोजित केली जाते. यंदाही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी दर महिन्यातील दोन दिवस अशी सहा दिवसांची कार्यशाळा तीन टप्प्यात आयोजित करण्यात आली होती. ८ – ९ सप्टेंबर १८, ६ – ७ ऑक्टोबर १८ आणि १७ – १ ८ नोव्हेंबर १८ अशा तीन टप्प्यांत ही कार्यशाळा मोठ्या उत्साहात पार पडली. पुणे, सांगली, रायगड, बीड, औरंगाबाद, नाशिक, लातूर, मुंबई, नांदेड, कोल्हापूर, ठाणे इत्यादी जिल्ह्यातील ४३ जण त्यामध्ये सहभागी झाले होते.

★पहिल्या् टप्प्यात स्वयंप्रतिमा, प्रेरणा, व्यक्तिमत्त्व विकास, त्याची संकल्पना, सृजनशीलता, संभाषण कौशल्ये इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करणारी व्याख्याने झाली. प्रशिक्षणार्थींनी संभाषण कौशल्याची ग्रंथपालांपुढील आव्हाने इत्यादी विषयांवर उपयुक्त व्याख्याने झाली. त्याचप्रमाणे अनेक राज्यांमध्ये ग्रंथालयांचे जाळे निर्माण करणारे प्रदीप लोखंडे आणि अक्षर भारती उपक्रमात शालेय ग्रंथालय उभारणीत महत्त्वाचे योगदान देणारे केदार तापीकर यांनी आपल्या यशोगाथांचे सहभागींना कथन केले. श्याम जोशी यांनी नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देऊन ग्रंथपालांना विद्यार्थ्यांच्या भावनिक आणि बौद्धिक जडणघडणीत कसे सहभागी होता येईल याबाबत मार्गदर्शन केले. ग्रंथपालाने विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गरजांप्रमाणे इंटरनेटवर माहिती कशी शोधावी, त्यासाठी उपयुक्त ठरणारी साधने कोणती याचीही वेगळी माहिती सहभागींना मिळाली. प्रा. चारुदत्त निमकर, श्याम जोशी, स्वाती महाळंक, डॉ. शुभदा नगरकर, प्रदीप लोखंडे, केदार तापीकर आदी मान्यवरांनी यामध्ये मार्गदर्शन केले. शालेय ग्रंथपालांच्या आधुनिक काळातील गरजा लक्षात घेऊन त्यांना नव्या ज्ञानाने आणि कौशल्याने परिपूर्ण करण्यासाठी प्रबोधिनीने राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याची प्रतिक्रिया अनेक ग्रंथपालांनी व्यक्त केली. अशा

प्रात्यक्षिके आणि सादरीकरणही केले. आपल्या व्यक्तिमत्त्वाबाबत आपण सजग नसतो आणि त्यामुळे जीवनातील अनेक कठीण क्षणांना सामोरे जाताना गडबडून जायला होते. त्यावर उपाय म्हणून पहिल्यापासूनच अशा पैलूंचा जाणीव–पूर्वक अभ्यास करायला हवा, अशी सहभागींची प्रातिनिधिक प्रतिक्रिया होती. त्यामुळे त्यांचा नंतरचा सहभाग अधिक उत्स्फूर्त ठरला. या कार्यशाळेत डॉ. अरुणा कौलगुड, विंदा बाळ, डॉ. दीपक गुप्ते आणि पुणे कार्यालयाच्या कार्यकारी प्रमुख स्वाती महाळंक यांनी मार्गदर्शन केले.



रवी पोखरणा

✶ या कार्यशाळेचा दुसरा टप्पा ६ आणि ७ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत पार पडला. त्यामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींच्या मागणीनुसार व्यक्तिमत्त्व विकासाच्या आणखी काही पैलूंवर अधिक सखोल प्रकाशझोत टाकणारी दोन व्याख्याने झाली. व्यक्तिमत्त्व विकासाचा विचार करीत असतानाच स्वतःचे विश्लेषण अर्थात स्वॉट ॲनॅलिसिस कसे करावे आणि त्याबरोबरच ध्येयनिश्चिती, जीवनाचे, कामाचे नियोजन, समस्यापूर्ती, संघबांधणी आणि नेतृत्व विकास इत्यादी पैलूंविषयी व्याख्याने, परस्पर संवाद, सहभाग आणि काही एक्सरसाईझ अशा रंजक पद्धतीने झाली. शरद सुंकर, डॉ. आशुतोष मिसाळ, डॉ. यशोधरा भालेराव, आशिष तागडे, डॉ. अरुणा कौलगुड आणि स्वाती महाळंक हे या कार्यशाळेतील वक्ते होते.



महाराष्ट्र टाईम्स (पुणे) चे संपादक पराग करंदीकर

यावेळी सहा ऑक्टोबर रोजी प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे आणि कार्यकारी प्रमुख (प्रशासन आणि प्रशिक्षण) रवी पोखरणा यांनी पुणे कार्यालयाला भेट दिली आणि प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. ''कुठल्या ही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर अंगातील नेतृत्वगुण प्रयत्नपूर्वक वाढविणे, जोपासणे गरजेचे आहे. त्यासाठी संभाषण कौशल्य आणि जनसंपर्क ही यशाची गुरुकिल्ली ठरू शकते. त्याचबरोबर दुसऱ्याची देहबोली समजून घेण्यासारखी कौशल्येही विकसित करायला हवीत'', असे प्रतिपादन रवींद्र साठे यांनी केले तर आपली माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पार्श्वभूमी असतानाही प्रबोधिनीच्या कार्याशी कसा स्नेहबंध जुळला, हे रवी पोखरणा यांनी सांगितले. प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन त्यांचा जीवन संपन्न होण्यासाठी कसा उपयोग होऊ शकतो हे ही त्यांनी विषद केले.

✶ कार्यशाळेचा तिसरा आणि अखेरचा टप्पा १७ आणि १८ नोव्हें बर २०१८ रोजी पार पडला. या टप्प्यात सहसंबंध, माध्यम व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, संघर्ष आणि ताणतणाव व्यवस्थापन, कार्यकर्ता निर्माण, देहबोली आणि कार्यसंस्कृती इत्यादी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी 'देहबोली' आणि 'कार्यकर्ता निर्माण' या विषयांवर उपस्थितांशी संवाद



ग्रंथपाल संपन्नता कार्यशाळेत सहभागी झालेले डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे ग्रंथपाल आणि उद्घाटन समारंभात भाषण करताना संस्थेचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे

साधला. यावेळी त्यांनी घेतलेल्या सत्रातील प्रात्यक्षिकांमध्ये प्रशिक्षणार्थी उत्फूर्तपणे सहभागी झाले होते. विवेक यत्नाळकर, प्रा. चारुदत्त निमकर, स्वाती महाळंक यांनी इतर सत्रात मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या समारोपासाठी महाराष्ट्र टाईम्सच्या पुणे आवृत्तीचे संपादक पराग करंदीकर यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांची प्रशंसा केली. ''आजच्या काळात नवे तंत्रज्ञान आणि नवी आव्हाने समोर उभी असताना कौशल्य विकासावर भर देणे, विविध प्रशिक्षणाद्वारे स्वतःच्या क्षमता वाढविणे आणि स्वतःला त्या अर्थाने सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. ही काळाची पावले ओळखून प्रबोधिनीने प्रारंभीपासूनच प्रशिक्षणावर दिलेला भर ही वाखाणण्याजोगी बाब आहे. त्याचा लाभ घेण्याने खऱ्या अर्थाने जीवन सुसंपन्न होण्यास मदत होईल,'' असे करंदीकर यांनी सांगितले. सहभागींना करंदीकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

♦ ग्रंथपाल संपन्नता कार्यशाळा –

पुण्यातील प्रसिद्ध डेक्कन एज्युकेशन सोसायटी–साठी प्रबोधिनीच्या वतीने ग्रंथपाल संपन्नता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सोसायटीच्या ४० संस्थांमधील ५३ शालेय आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल आणि साहाय्यक ग्रंथपाल यामध्ये सहभागी झाले होते. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात २५ – २६ – २७ ऑक्टोबर २०१८ रोजी ही कार्यशाळा पार पडली. पुणे विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल आणि ग्रंथालयशास्त्राचे तज्ज्ञ डॉ. शां. ग. महाजन, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे आणि प्रबोधिनीच्या पुणे कार्यालयाच्या कार्यकारी प्रमुख स्वाती महाळंक यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथपालांचा व्यक्तिमत्त्व विकास, संभाषण कौशल्ये, नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, त्यासाठीची तयारी, जनसंपर्क व्यवस्थापन, वाचन संस्कृती जोपासनेसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम अशा विविध विषयांवर या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. 'संदर्भ ग्रंथालयाची उभारणी' आणि 'नॅकसाठी ग्रंथालयाची सुसज्जता' या विषयांवरही तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

संस्थेच्या उत्तन येथील संदर्भ ग्रंथालयाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारे दिलीप नवेले यांनी वक्ते आणि सहभागींमधील संवाद अधिक दृढ केला. डॉ. शां. ग. महाजन, डॉ. धर्मराज वीर, डॉ. शुभदा नगरकर, डॉ. वंदना शेलार, प्रा. चारुदत्त निमकर, प्रसाद भडसावळे, प्रदीप लोखंडे, स्वाती महाळंक यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. संवाद, प्रात्यक्षिके, पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशन आदी माध्यंमांद्वारे झालेल्या या कार्यशाळेला प्रशिक्षणार्थी ग्रंथपालांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




शिवराज गोर्ले यांचा परिचय करून देताना वैभव गोडसे, सोबत पुणे कार्यालयाच्या कार्यकारी प्रमुख स्वाती महाळंक

♦ नेतृत्व विकास कार्यशाळा –

पुण्याजवळ पिंपरी–चिंचवड आणि भोसरी इथं असलेल्या डब्ल्यू. टी. ई. या कंपनीच्या वतीने भोसरी इथे कर्मचाऱ्यांसाठी नेतृत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. स्वयंविश्लेषण, नेतृत्व विकास, संघबांधणी, परस्पर संबंध, कार्यसंस्कृती, संभाषण कौशल्य, जनसंपर्क विषयांवर या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे, डॉ. दीपक गुप्ते, डॉ. नीलिमा आपटे, प्रा. चारुदत्त निमकर आणि स्वाती महाळंक यांनी यामध्ये मार्गदर्शन केले. कंपनीचे वीस कर्मचारी त्यामध्ये सहभागी झाले होते.

♦ संवाद कौशल्ये आणि जनसंपर्क व्यवस्थापन

– सध्याच्या काळातील जनसंपर्काची वाढती गरज आणि त्यासाठी आवश्यक असणारे संभाषण कौशल्य लक्षात घेऊन पुण्यात 'संवाद कौशल्य आणि जनसंपर्क व्यवस्थापन' या विषयावरील तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व शैली कशी विकसित करावी, संभाषण कौशल्ये कसे वाढवावे, उच्चारशास्त्राबाबतची जागरूकता, जनसंपर्काची गरज, उपयुक्तता, त्यातील संधी, जनसंपर्कासाठी सोशल मिडियाचा उपयोग इत्यादी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सहभागींची प्रात्यक्षिकेही झाली. शिवराज गोर्ले, मुकुंद नाडगौडा, अण्णा बोदडे, डॉ. दत्ता कोहिनकर, स्वाती महाळंक आणि भारतीय लष्करामध्ये प्रदीर्घकाळ जनसंपर्क अधिकारी म्हणून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडलेले कर्नल विनायक तांबेकर आदींनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. जनसंपर्क अधिकारी म्हणून भारतीय लष्करामध्ये काम करताना कार्यक्षमतेचा कस लागला. अनेक बाबी गोपनीय असल्यामुळे त्याचा कोणाला मागमूसही लागू न देता माहिती मिळविणे, ती वरिष्ठांपर्यंत पोहचवून त्याबाबत पुढील आदेश मिळविणे आणि ते कार्यान्वित करणे म्हणजे खरोखरीच तारेवरील कसरत असते. मात्र अशा कठीण प्रसंगी विश्वासू व्यक्तिबरोबर भक्कम जनसंपर्क असेल तरच टिकाव लागतो, असे सांगून कर्नल तांबेकर यांनी आपले युद्धकाळापासूनचे अनेक अनुभव सहभागींना कथन केले. कर्नल तांबेकर यांच्या हस्ते सहभागींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.



मुकुंद नाडगौडा

ज्ञान-नैपुण्य केंद्र : व्यावसायिक जगताशी नवा स्नेहबंध



उत्तन, भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे ज्ञान-नैपुण्य केंद्र ही प्रबोधिनीची मुख्य वास्तू, आता प्रसिद्ध होत चालली आहे. व्यावसायिक उपक्रमांसाठी या वास्तूचा उपयोग करणाऱ्या अनेक संस्थांबरोबर ज्ञान-नैपुण्य केंद्राचा स्नेहबंध आता दृढ होत आहे. व्यवसाय विश्वातील अनेक व्यावसायिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि अन्य सामाजिक संस्था या ज्ञान-नैपुण्य केंद्राच्या अंतर्गत मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घेत आहेत. ऊर्जा, शिक्षण, अभियांत्रिकी, रसायन व व्यवस्थापन क्षेत्रांतील सल्लागार संस्था यात प्रामुख्याने आघाडीवर आहेत.

लार्सन ॲण्ड टुब्रो इलेक्ट्रिकल्स ॲण्ड ऑटोमेशन, पिडिलाईट इंडस्ट्रीज लिमिटेड.,एन. ए. शाह असोसिएटस्, रतन पॉलीप्लास्ट, एस.जी.सी.ओ., बॉम्बे चार्टर्ड अकाऊंटस् सोसायटी, मॅजीस्को सॉफ्टवेअर ॲण्ड सोल्यूशन्स इंडिया लि., नॅशनल कौंसिल फॉर प्रमोशन ऑफ सिंधी लँग्वेज (नवी दिल्ली), महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी लि., ठाणे जनता सहकारी बँक इत्यादी संस्थांनी उत्कृष्ट प्रतिसाद देत ज्ञान-नैपुण्य केंद्राद्वारे दिल्या जाणाऱ्या सुविधांची प्रशंसा केली आहे. या काळात नवीन व्यावसायिक संस्था प्रबोधिनीच्या संकुलाशी जोडल्या गेल्या आहेत.

चेतना कॉलेज, सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, मुंबई एज्युकेशन ट्रस्ट, विवेकानंद एज्युकेशन ट्रस्ट इत्यादी संस्थांनी देखील आपले प्रशिक्षण कार्यक्रम प्रबोधिनीच्या संकुलात गेल्या वर्षभरात घेतले आहेत.

सामाजिक संस्थांच्या क्षेत्रातील द एज्युकेशन फॉर इमॅन्सीपेशन ट्रस्टी, टीच इंडिया, सेव्ह चिल्ड्रेन साधना ट्रस्ट, ओरिगामी मित्र, फाईट अगेन्स्ट हंगर फाऊंडेशन, शेल्ड फाऊंडेशन, द लॉर्ड जगन्नाथ ट्रस्ट, हेमा फाऊंडेशन, कच्छ युवक संघ, यू ॲण्ड आय ट्रस्ट, ब्रह्मविद्या साधक संघ, परिवर्तन महिला संस्था, मुंबई ग्राहक पंचायत, अर्श विद्या फाऊंडेशन इत्यादी संस्थांनी आपली प्रशिक्षण शिबिरे या संकुलात आयोजित केली होती.'यशदा' या शासकीय प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून नव्याने निवडून आलेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद सदस्य आणि सरपंच यांची प्रशिक्षण शिबिरे विविध गटांमध्ये पार पडली. असे प्रशिक्षणाचे ९ कार्यक्रम पार पडले. त्यामध्ये ५५३ प्रतिनिधी सहभागी झाले होते. याव्यतिरिक्त महाराष्ट्र शासनातर्फे शिक्षण विभाग, एन.सी.पी.सी.आर. या विभागांनीही आपली प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली होती. यात विविध विभागांचे मंत्री, सचिव आणि महासंचालक स्तरावरील अधिकारी यांनी प्रबोधिनीच्या या ज्ञान-नैपुण्य केंद्राच्या संकुलाला भेट दिली.

मला असे वाटते...

ज्ञान - नैपुण्य केंद्राचा हा नवा स्नेहबंध व्यावसायिक जगतालाही सुखावणारा ठरला आहे. प्रबोधिनीचा परिसर, तिथल्या सेवा, सुविधा इतकेच काय पण तिथली भोजन व्यवस्था हा ही या स्नेहबंधाला अधिक आनंद प्रदान करणारा महत्त्वाचा घटक ठरला आहे. प्रशिक्षणे आणि इतर कामांच्या निमित्ताने या परिसराला भेट देणाऱ्या आणि त्या वास्तव्यातून अंतर्बाह्य समाधान पावलेल्या काही मान्यवरांच्या या बोलक्या प्रतिक्रिया...

एन. ए. असोसिएट्सचे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये ऑफसाईट ऑडिटचे हे तिसरे वर्ष आहे. आम्ही इथे आल्यावर नेहमी खूश व संतुष्ट होतो. येथे आपल्याला नव्या गोष्टी शिकण्यासाठी वातावरण मिळते. येथे जेवण व कर्मचारी वर्ग उत्कृष्ट दर्जाचे आहेत.

– मिलन मोदी, पार्टनर,
एन. ए असोसिएट्स.

हा संपूर्ण परिसर बघून आम्हाला खूप आश्चर्य वाटले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही एवढी सुंदर जागा आहे की येथे आल्यावर कोणाचेही मन प्रसन्न होऊन जाते. येथील वास्तव्य फारच आनंदी होते. दररोज जेवण फार चविष्ट व वेगवेगळ्या प्रकारचे होते. वातावरण आध्यात्मिकतेला पोषक आहे. इथली निवास व्यवस्था व प्रशिक्षण कक्ष विस्तृत आहेत. त्यामुळे येथे विविध व्यायामही करू शकता. मी इथे येऊन फार खूश आहे.

–डॉ. मानदेव सिंह, वैद्यकीय डॉक्टर, जर्मनी.

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या संपूर्ण टीमचे मन:पूर्वक अभिनंदन ! नियोजनापासून शेवटपर्यंत सर्व विनासायास पार पडले, अगदी एका सूत्रात बांधल्यासारखे ! या शांत–सुंदर प्रसन्न वातावरणात असूनही एखाद्या व्यवस्थापकीय विद्यालयातल्या दृकश्राव्य उपकरणांसारख्या आधुनिक सोयी–सुविधांनी सज्ज प्रांगणात भूतकाळातल्या विद्यार्थी दशेत गेल्याचा भास झाला. इथले जेवण भिन्नतेच्या व स्वच्छतेच्या बाबतीत अप्रतिम आहे. विद्यार्थी व सहभागी अगदी भरगच्च आहार करताना दिसतात. प्रबोधिनीचे वातावरण व्यवसायनिष्ठ, अफलातून व नवचेतना देऊन पुनरुज्जीवित करणारे आहे.

– डॉ. नंदिता दास, अधिष्ठाता,
चेतना व्यवस्थापन व संशोधन संस्था.

शासकीय समितीत प्रबोधिनीच्या अधिकाऱ्यांची निवड



रवींद्र साठे

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांची हैद्राबाद येथील राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य तसेच केंद्रीय पंचायत राज विभागाच्या राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानासाठी सरकारने तयार केलेल्या केंद्रीय समितीचे सदस्य म्हणून अहवाल वर्षात निवड झाली.



रवी पोखरणा

प्रबोधिनीचे दुसरे एक अधिकारी रवी पोखरणा यांचीही केंद्र सरकारच्या पंचायती राज विभागाच्या राष्ट्रीय ग्रामीण आजीविका समितीचे सदस्य म्हणून निवड झाली.

आयआयडीएलच्या नव्या तुकडीचा शुभारंभ



भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान अर्थात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रॅटिक लीडरशीप (आय.आय.डी.एल.)च्या दुसऱ्या तुकडीचा शुभारंभ ८ जुलै २०१८ रोजी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या केशवसृष्टी संकुलामध्ये झाला. भारताच्या दहा राज्यातील विविध प्रकारची पार्श्वभूमी असलेल्या २४ विद्यार्थ्यांची या अभ्यासक्रमासाठी निवड झाली होती. या नऊ महिने कालावधीच्या अभ्यासक्रमाच्या पहिल्या तिमाहीची सुरुवात समन्वित कार्यक्रमाने झाली. एक आठवडाभर या अभ्यासक्रमाची तोंडओळख व्हावी या दृष्टीने विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला.

राजकारण आणि लोकशाही, नेतृत्व आणि व्यवस्थापन, शासन आणि सार्वजनिक धोरण अशा तीन मुख्य प्रकारात हा अभ्यासक्रम विभागलेला आहे.

♦ तज्ज्ञांशी संवाद

या शैक्षणिक वर्षात शिक्षणतज्ज्ञ तसेच इतर विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यामध्ये महेश शर्मा (माजी केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री, सुधीर मुनगंटीवार (वनमंत्री), राजेंद्र आर्लेकर (गोवा विधानसभेचे माजी सभापती) इस्त्रायली दूतावासाचे मुंबई येथील काऊन्सेल जनरल याकोव फिंकेलस्टाईन, निवृत्त लेफ्टनंट जनरल दत्तात्रय शेकटकर, अविनाश सणस (निवडणूक उपायुक्त, महाराष्ट्र), विजय चौथाईवाले (प्रमुख, भारतीय जनता पार्टी, परराष्ट्र विभाग), अशोक चौगुले (कार्यकारी संचालक, चौगुले शिपींग), बिपीन (राष्ट्रीय स्वयंसेवक



संघ, कोकण सहप्रांत प्रचारक), रतन शारदा (लेखक), हिमांशु पटेल (माजी सरपंच), सय्यद जफर इस्लाम (राष्ट्रीय प्रवक्ते, भाजप), पाशा पटेल (शेतकरी नेते), ए.के. मिश्रा (चाणक्य, आयएएस अॅकॅडमी), कृष्णा हेगडे (माजी आमदार, काँग्रेस), स्मिता गायकवाड (निवृत्त कॅप्टन), रूबेन मास्कारेहन्स (राष्ट्रीय सहसचिव, आम आदमी पार्टी), सतीश मराठे (संचालक, रिझर्व्ह, बँक ऑफ इंडिया), सुनील आंबेकर (राष्ट्रीय संघटन सचिव, अ.भा.वि.प.), शेफाली वैद्य (स्तंभ लेखिका), शहेजाद पूनावाला (बंडखोर युवा नेते, काँग्रेस), मयंक गांधी (बंडखोर नेते, आम आदमी पक्ष), आशुतोष मुळगीकर (अर्थतज्ज्ञ आणि समाज माध्यम कार्यकर्ते), शंतनु गुप्ता (लेखक) आदींचा त्यामध्ये समावेश आहे.

♦ प्रत्यक्ष क्षेत्रभेटी

वर्गातील व्याख्यानांसह विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष क्षेत्र भेटींचेही आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये भाईंदर पोलीस स्थानक, शहीद कौस्तुभ राणे यांचे निवासस्थान, ग्लोबल पॅगोडा, कन्हेरी लेणी, शिवसेना नेते मनोहर जोशी यांचे कार्यालय, मुंबई उच्च न्यायालय आणि केशवजी नाईक चाळ, मीरा-भाईंदर महानगरपालिका, कॉन्सुलेट जनरल ऑफ युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका, माजी खासदार किरीट सोमय्या यांचे कार्यालय, दादर चैत्यभूमी, संघ कार्यालय, धारावी झोपडपट्टी, सेना भवन, भाजपा प्रदेश कार्यालय, खासदार गोपाळ शेट्टी यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, मुख्यालय, नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा, रेड लाईट भागातील प्रेरणा स्वयंसेवी संस्थेला भेट इत्यादींचा समावेश होता.

♦ अभिरूप संयुक्त राष्ट्र आणि अभिरूप संसद

भारतीय लोकशाही नेतृत्व संस्थान अर्थात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रॅटिक लीडरशीप (आय.आय.डी.एल.)च्या वतीने विद्यार्थ्यांना संयुक्त राष्ट्र आणि संसदेच्या कामकाजाची माहिती व्हावी, यासाठी अभिरूप संयुक्त राष्ट्रसंघ आणि अभिरूप संसदेचं आयोजन करण्यात आले होते. आदित्य सुहास लेले या अभिरूप संयुक्त राष्ट्रसंघाच्या अध्ययक्षस्थानी होते तर ओ. पी. सकलेचा (आमदार, मध्य प्रदेश), राज पुरोहित (आमदार) हे अभिरूप संसदेच्या अध्यक्षस्थानी होते.

राजधानी दिल्ली अभ्यास दौरा

या संपूर्ण अभ्यासक्रमातील महत्त्वाचा घटक असलेल्या राजधानी दिल्लीचा अभ्यास दौरा ३ ते ९ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता.

या दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांना विविध उच्च राजकीय नेतेमंडळी आणि पदाधिकाऱ्यांना भेटण्याची संधी मिळाली. त्यामध्ये उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू, पंतप्रधान कार्यालयामधील उत्तरपूर्व विभागाचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह, सांस्कृतिक मंत्रालयाचे मंत्री डॉ. महेश शर्मा, ज्येष्ठ राजकीय नेते व जनता दल संयुक्तचे राष्ट्रीय प्रवक्ते के. सी. त्यागी, विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष आलोक कुमार, संयुक्त राष्ट्रातील भारताचे माजी स्थायी प्रतिनिधी राजदूत असोक मुखर्जी, दिल्ली भा.ज.पा. चे खजिनदार नरेंद्र चावला, मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, भा. ज.पा. चे राष्ट्रीय संघटन महामंत्री रामलाल, भा. ज. पा. सहयोग सेलचे नवीन सिन्हा, भा. ज. पा.चे राष्ट्रीय उपाध्यक्ष बैजयंत पांडा, नवी दिल्लीच्या खासदार मीनाक्षी लेखी, दीनदयाळ संशोधन संस्थेचे सरचिटणीस अतुल जैन, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी रिसर्च फाऊंडेशनचे निर्देशक अनिर्बन गांगुली आदींचा समावेश होता.

या विद्यार्थ्यांना राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना भेटी देण्यासाठीही नियोजन करण्यात आले



उपराष्ट्रपती एम. वेंकय्या नायडू यांच्याशी विद्यार्थ्यांची भेट.

होते. त्यामध्ये भारतीय संसद, राष्ट्रपती भवन, सरदार पटेल संग्रहालय, रेल्वे संग्रहालय, राष्ट्रीय पुरातत्व संस्था, इंडिया गेट, दीनदयाळ संशोधन संस्था, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी रिसर्च फाऊंडेशन राजघाट, गांधी स्मृती स्मारक आदी स्थळांचा समावेश होता. या विद्यार्थ्यांनी नंतर विविध मंत्रालयांच्या सनदी अधिकारी व सरकारी पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. त्यामध्ये गव्हर्नमेंट ई–मार्केट प्लेसच्या मुख्य कार्यकारी अधिकारी राधा चौहान, नीती आयोगाचे उपाध्यक्ष राजीवकुमार, माय जीओव्हीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद गुप्ता, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष प्रियांक कानुनगो आदींचा समावेश होता. एशियन न्यूज इंटरनॅशनल –ए.एन.आय.– या अग्रणी वृत्तसंस्थेच्या वृत्तविभागालाही विद्यार्थ्यांनी भेट दिली व मुख्य संपादक स्मिता प्रकाश यांच्याशी संवाद साधला.

निवडणूक अभ्यास दौरा

निवडणूक अभ्यास दौरा कार्यक्रमाअंतर्गत आय.आय.डी.एल.च्या विद्यार्थ्यांचा विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने मध्य प्रदेशचा दौरा आयोजित करण्यात आला होता. यात विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा जणांच्या गटात विभागणी करून त्यांना बूथस्तरीय व्यवस्थापन, घरोघरी प्रचाराची जबाबदारी देण्यात आली होती.



मध्य प्रदेश दौऱ्यात नेतेमंडळींशी चर्चा

इतर उपक्रमांत सहभाग



★ **इस्रायली विद्यार्थी भेट** (१६,१७ ऑगस्ट)–

नियमित अभ्यासक्रमासह आय. आय. डी. एल.च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक आदानप्रदानांतर्गत भारत दौऱ्यावर असलेल्या इस्रायली विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. इस्रायलच्या कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अकॅडमिक स्टडीजच्या ४० विद्यार्थ्यांनी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीला भेट दिली त्यावेळी या विद्यार्थ्यांनी इस्त्रायली विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर चर्चा केली आणि माहिती जाणून घेतली.

★ **इंग्लिश फॉर डिप्लोमसी** (२२ – २५ ऑक्टोबर)– अमेरिकन दूतावासाच्या वतीने २२ ते २५ ऑक्टोबर २०१८ या काळात 'इंग्लिश फॉर डिप्लोमसी' हा कार्यक्रम प्रायोजित करण्यात आला होता. राजकारण आाणि मुत्सिद्देगिरी या बाबी डोळ्यासमोर ठेवून त्या अनुषंगाने इंग्लिशविषयक भाषिक कौशल्ये वाढावीत, यासाठी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली होती. ॲलिसीया ब्रेंट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी त्या खास अमेरिकेहून आल्या होत्या आणि त्यांनी केशव सृष्टीमध्ये वास्तव्यही केले.

★ भारतीय लोकतांत्रिक नेतृत्व अध्ययन केंद्राच्या (आय.आय.डी.एल्.) च्या विद्यार्थ्यांनी आर्ट ऑफ लिव्हिंग अभ्यासक्रम, अनव्हेलिंग जम्मू ॲन्ड काश्मीर आणि सुशासन संगम या प्रबोधिनीत झालेल्या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

पहिल्या तुकडीचा पदवीप्रदान समारंभ

या अभ्यासक्रमातील पहिल्या तुकडीमधील ३२ विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ २ जुलै २०१८ रोजी प्रबोधिनीच्याा केशव सृष्टी संकुलात आयोजित करण्यात आला होता. या दीक्षांत समारंभाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यसभा सदस्य डॉ. नरेंद्र जाधव, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि प्रबोधिनीचे महासंचालक व आयआयडीएलचे अधिष्ठाता रवींद्र साठे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

रवींद्र साठे यांनी यावेळी कार्यक्रमाचे स्वागतपर प्रास्ताविक केले तर डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी या अभ्यासक्रमाची पार्श्वभूमी विषद केली. यानंतर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या अभ्यासक्रमाचे अधिष्ठाता रवींद्र साठे यांनी नव्या तुकडीतील विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि त्यांना अभ्यासक्रमासाठी दाखल करून घेताना शपथ दिली. आयआयडीएलच्या या दुसऱ्या तुकडीमध्ये चार मुलींसह एकूण २४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्यानंतर डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या भाषणात नेतृत्वाविषयीचे



आय.आय.डी.एल.च्या पहिल्या तुकडीच्या पदवीप्रदान समारंभात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपले विचार मांडले, तर नितीन गडकरी यांनी राजकारण आणि राजकीय नेतृत्वाचे वास्तववादी पैलू आपल्या भाषणातून स्पष्ट केले. त्यांच्या विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. आयआयडीएलचे उपअधिष्ठाता रवी पोखरणा यांनी उपस्थितांचे आभार मानले. देवेंद्र पै यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रबोधिनीचे विश्वस्त आमदार भाई गिरकर, रेखा महाजन, अरविंद रेगे, आमदार नरेंद्र मेहता आणि महापौर डिंपल मेहता आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आयआयडीएल – संख्यात्मक कामगिरी वर्ष २०१८–१९	
एकूण व्याख्याने	४०६
एकूण तज्ज्ञ अभ्यास मार्गदर्शक	१६८
क्षेत्रभेटी	१८
एक सप्ताहाचे अभ्यास दौरे	०२
पाहिलेले चित्रपट	०८

विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया



मी एका लहानशा गावचा सरपंच आहे. या अभ्यासक्रमामुळे माझ्या व्यक्तिमत्त्व विकासाला मोठा वाव मिळाला. माझी वक्तृत्वकला संख्यात्मक आणि गुणात्मकरित्या सुधारण्यास मोठी मदत झाली. **– सागरसिंह वाघेला, बॅच** (तुकडी) **द्वितीय**



या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याआधी मला असे वाटायचे की मला सर्व गोष्टी माहीत आहेत. पण हा अभ्यासक्रम करताना माझे डोळे उघडले, मला जाणवले की आपल्या देशाविषयीच्या अनेक गोष्टी मला माहीतच नव्हत्या.**– हीना किनी, बॅच** (तुकडी) **द्वितीय**



इथे मला अनेक गोष्टी शिकता आल्या. या अभ्यासक्रमाद्वारे देशातील विविध विषयांचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यास मदत होते. भारतातील नव्या पिढीचे राजकारणी हे सुशिक्षित असणे अपेक्षित आहे आणि आयआयडीएल हा असा अभ्यासक्रम आहे, जो भविष्यातील असे राजकारणी घडवीत आहे, घडविणार आहे. **– शशांक राव, बॅच** (तुकडी) **द्वितीय**

वरिष्ठ व्यवस्थापकांसाठी नैतिक नेतृत्व विकास कार्यक्रम



रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी व राष्ट्रीय मनुष्यबळ विकास यंत्रणा (नॅशनल एच. आर. डी नेटवर्क) यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांच्या वरिष्ठ व्यवस्थापकांसाठी १९ ते २३ जून २०१८ या कालावधीत ग्रीन एकर, श्रीनगर, जम्मू-काश्मीर येथे नैतिक नेतृत्व विकास कार्यक्रम आयोजित केला होता.

राष्ट्रीय मनुष्यबळ विकास यंत्रणेचे महासंचालक धनंजय सिंग यांनी प्रास्ताविक केले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी सहभागींसाठी प्रात्यक्षिकांसह विविध आणि खेळ घेतले. त्यामुळे सहभागींचा एकमेकांशी व्यवस्थित परिचय झाला आणि त्यांचे परस्परातील सौहार्द वाढण्यास मदत झाली. केंद्रीय विद्यापीठ जम्मूचे प्र-कुलगुरू अशोक ऐमा यांनी ट्रान्सफॉर्मेशनल लीडरशिप या विषयावर सहभागींशी संवाद साधला. जोधपूर येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या (आय आय टी) सल्लागार व मुख्य प्रशिक्षक डॉ. कल्पना माथुर, भारतीय एस आय एम एस संस्थेचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी विकास गुप्ता आणि व्यवस्थापकीय संचालक आनंद पिल्लई आदी मान्यवरांनी लीडरशिप मॅटर्स या विषयाची मांडणी केली.

विषय तज्ज्ञांनी उच्च व्यावसायिक गटासाठी वर्गातील व्याख्याने, प्रारूपे व प्रतिकृती, नैतिक तर्क व कौशल्य विकसित करण्यासाठी मार्गदर्शन आदींच्या सहाय्याने विषय समजावून सांगितला.

पाच दिवसांच्या या निवासी प्रशिक्षण कार्यक्रमात १३ वरिष्ठ व्यवस्थापक सहभागी झाले होते. आय.ओ.सी.एल. एम,एन.पी.सी. पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन, राष्ट्रीय केमिकल ॲण्ड फर्टीलायझर्स इत्यादी कंपन्यांचा त्यामध्ये समावेश होता.

नगरसेवक अभिमुखता कार्यक्रम

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि हरियाणा लोकप्रशासन संस्था(हिपा) यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुग्राम व फरीदाबाद महानगरपालिकेच्या नगरसेवकांसाठी अभिमुखता कार्यक्रम गुरूग्राम येथे ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर २०१८ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला दोन्ही नगरपालिकांचे मिळून ४२ नगरसेवक उपस्थित होते. उद्घाटन सत्राला प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे, 'हिपा'चे महासंचालक डॉ. जी. प्रसन्नकुमार, अतिरिक्त संचालक एम. डी. सिन्हा, संयुक्त संचालक डॉ. एकता चोप्रा व सहायक संचालक (प्रशासन) रेखा दहिया उपस्थित होत्या.

'नगरपालिका कायदा : प्रशासन, नगरसेवकांच्या जबाबदाऱ्या व भूमिका' या विषयावर एस. डी. एम. सी. च्या अध्यक्ष शिखा रॉय यांनी मार्गदर्शन केले. नगरपालिकेच्या कामकाजाच्या तांत्रिक बाबींबद्दल त्यांनी माहिती दिली. मनुष्यबळ विकास तज्ज्ञ हरिता मारवाह यांनी 'क्षमता बांधणीतून स्व-सबलीकरण' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी दैनंदिन जीवनात नगरसेवकांनी जनतेबरोबर व्यवहार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या संभाषण कौशल्यावर त्यांनी विवेचन केले.

प्रबोधिनीचे महासंचालक रवींद्र साठे यांनी 'सरकारी योजनांत सुनिश्चित लोकसहभाग' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रभावी नेता व लोकप्रतिनिधी होण्यासाठी आत्मसात करावयाच्या विविध नेतृत्व गुणांवर त्यांनी भर दिला.

'नगरसेवकांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये व विशेषाधिकार' या विषयावर ईडीएमसीचे माजी महापौर, हर्षदीप मल्होत्रा यांनी मार्गदर्शन केले. मतदारसंघाच्या समस्या प्रभावीपणे कशा सोडवाव्यात यावर त्यांनी विवेचन केले.

'स्मार्ट सिटी : संकल्पना व पैलू' या विषयावर हे ॲमिटी विद्यापीठाच्या अधिष्ठाता(डीन) मोना अशर यांनी,'शहरीकरणातील उदयोन्मुख विषय : रहदारी, कचरा व्यवस्थापन व पाणी पुरवठा' या विषयावर प्रा.के के पांडे यांनी, तर 'नगरपालिकांचे आर्थिक व्यवस्थापन (बजेट)' या विषयावर ज्येष्ठ वित्त व्यवस्थापनतज्ज्ञ आलोक शिरोमणी यांनी मार्गदर्शन केले. प्रबोधिनीच्या मुरारी साहू यांनी आभार मानले.

ट्रान्सफॉर्मिंग इंडिया डायलॉग्ज

सत्र आठवे

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या 'ट्रान्सफॉर्मिंग इंडिया डायलॉग्ज' या मालिकेचे ८ वे सत्र २७ एप्रिल २०१८ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते. नेहरु स्मारक संग्रहालय व ग्रंथालयामध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमात गव्हर्मेन्ट ई-मार्केटप्लेसच्या मुख्य कार्यकारी आधिकारी राधा चौहान या प्रमुख व्याख्यात्या होत्या. गव्हर्मेन्ट ई-मार्केटप्लेसद्वारे पुरविल्या जाणाऱ्या अनोख्या सेवा व सरकारी संस्था/कंपन्यांना सामान्य वापरासाठी आवश्यक असणाऱ्या सेवा या विषयी त्यांनी माहिती दिली. वस्तूंची ऑनलाईन मागणी प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी कार्यरत असलेल्या यंत्रणेबद्दल त्यांनी विवेचन केले.

या कार्यक्रमाला प्रबोधिनीचे उपाध्यक्ष, खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, व नेहरु स्मारक संग्रहालय व ग्रंथालयाचे उपसंचालक डॉ. रवी मिश्रा उपस्थित होते.

सत्र नववे

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या ट्रान्सफॉर्मिंग इंडिया डायलॉग्ज या मालिकेचे नववे सत्र २८ जून, २०१८ रोजी नवी दिल्ली येथील नेहरु स्मारक संग्रहालय व ग्रंथालय येथे आयोजित केले होते. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याणमंत्री जे.पी.नड्डा प्रमुख वक्ते होते. मोदी सरकारने देशातील आरोग्य यंत्रणा सुधारण्यावर भर दिला असून देशातील सर्वसामान्य माणसाला अत्यंत वाजवी दरात या सेवा उपलब्ध व्हाव्यात म्हणून विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत, असे ते म्हणाले.

आपल्या मंत्रालयाने सुरू केलेल्या योजना व उपक्रम यांचीही त्यांनी यावेळी माहिती दिली.

या कार्यक्रमाला प्रबोधिनीचे उपाध्यक्ष, खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, नेहरु स्मारक संग्रहालय व ग्रंथालयाचे उपसंचालक डॉ. रवी मिश्रा आणि अ.भा.वि.प.चे माजी अध्यक्ष राजकुमार भाटिया उपस्थित होते.

प्रा. गंगाधर पानतावणे यांना आदरांजली



मराठीतील ज्येष्ठ लेखक, आंबेडकरवादी विचारवंत, संशोधक, समीक्षक आणि पद्मश्री सन्मानप्राप्त प्रा. गंगाधर पानतावणे यांचे २७ मार्च २०१८ रोजी निधन झाले. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने नवी दिल्ली येथील नव्या महाराष्ट्र सदनात ७ एप्रिल २०१८ रोजी प्रा. पानतावणे यांना आदरांजली वाहण्यासाठी विशेष सभेचे आयोजन केले होते.

राज्यसभेचे खासदार डॉ. नरेंद्र जाधव व प्रबोधिनीचे उपाध्यक्ष, खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्यासमवेत अनेक लेखक, प्राध्यापक, पत्रकार व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शासकीय योजनांचे सर्वेक्षण – मूल्यांकन



जलयुक्त शिवार जलद मूल्यमापन

महाराष्ट्र पाणीटंचाईमुक्त करण्यासाठी एकात्मिक पद्धतीने नियोजनबद्धरित्या कृती आराखडा तयार करून पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी आणि त्याद्वारे शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण करण्याच्या हेतूने शासनाने ''जलयुक्त शिवार अभियान'' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम केला. त्यानुसार जलयुक्त शिवार अभियान २०१५–१६ या वर्षात ६२०२ गावात, २०१६–१७ या वर्षात ५२८८ आणि २०१७–१८ मध्ये ५०२८ गावात म्हणजे एकूण १६ हजार ५१८ गावात कामे करण्यात आली. २०१४–१५ पासून राज्यामध्ये जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत असून अभियानापूर्वी व अभियानानंतर विविध घटकात, परिस्थितीत झालेला बदल व त्याअनुषंगाने या अभियानाचा झालेला प्रभाव व उपयोग तपासण्याकरिता जलयुक्त शिवार अभियानाचे जलद मूल्यमापन पद्धतीने अभ्यास व मूल्यमापन करण्याचे काम यशदा, पुणे मार्फत रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीकडे सोपविण्यात आले होते.

या अभ्यास प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील सहा महसूल विभागातील ११ जिल्ह्यातील ३६ तालुक्यातील १४४ गावांमध्ये संस्थेच्या सर्वेक्षकांनी प्रत्यक्ष भेटी दिल्या. एकूण १४५२ प्रमुख व्यक्तींच्या भेटी घेऊन मुलाखती घेतल्या व अभियानाबद्दल मत व गावात घडत असलेले बदल जाणून घेतले. दुसऱ्या टप्प्यामध्ये वरील पैकीच निवडक १८ गावांमध्ये ५४४ शेतकरी कुटुंब व ९२ भूमिहीन मजूर कुटुंब अशा एकूण ६३६ कुटुंबाची माहिती व या अभियानाने त्यांच्या जीवनात होत असलेले सकारात्मक / नकारात्मक बदल जाणून घेतले. हा अभ्यास प्रकल्प २५ सप्टेंबर २०१८ ला सुरू झाला. त्यानंतर ३० जानेवारी २०१९ ला दोन टप्प्यामध्ये सर्वेक्षण व माहिती संकलन करून त्या आधारावर अहवाल लिहून तो 'यशदा' पुणे,कडे सुपूर्द करण्यात आला.

मागेल त्याला शेततळे

'मागेल त्याला शेततळे' ही राज्य शासनाची एक महत्त्वाकांक्षी योजना असून त्याच्या लाभार्थींनी त्रयस्थ संस्थांमार्फत भौतिक तपासणी आणि मूल्यमापन करून घेणे शासन निर्णयाद्वारे अनिवार्य करण्यात आले आहे. ही त्रयस्थ संस्था म्हणून काम करण्यासाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी अधिकृत संस्था म्हणून नियुक्त करण्यात आली .

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीद्वारा यापूर्वी चंद्रपूर व पुणे जिल्ह्यातील 'मागेल त्याला शेततळे' योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या शेततळ्याची भौतिक तपासणी व मूल्यमापन अनुक्रमे जानेवारी २०१७ व डिसेंबर २०१७ मध्ये केले होते. चंद्रपूर जिल्ह्यातील १५४ व पुणे जिल्ह्यातील ५०३ अशा एकूण ६५७ शेततळ्यांची

तपासणी केली होती.



संस्थेचा याबाबतचा एकंदरीत पूर्वानुभव विचारात घेऊन शासनाने राज्यातील पूर्ण झालेल्या शेततळ्यांच्या कामांची भौतिक पाहणी व मूल्यमापनाचे काम संस्थेकडे सोपविले. ३० सप्टेंबर २०१७ अखेर पूर्ण झालेल्या एकूण शेततळ्यांपैकी ५ टक्के नमुना शेततळ्यांची पाहणी करणे अपेक्षित होते. संस्थेने एकूण ६ महसूल विभागातील ३४ जिल्ह्यातील २८७ तालुक्यातील गावांमध्ये २ हजार २१४ शेततळ्यांची भौतिक तपासणी केली. ही नमुना निवड मृदसंधारण विभागाने निश्चित केली होती.

संस्थेने राज्यातील सर्व जिल्ह्यांत पूर्ण करण्यात आलेल्या शेततळ्यांच्या कामांना एप्रिल ते जून २०१८ या कालावधीमध्ये भेटी देऊन भौतिक तपासणी व मूल्यमापन केले. क्षेत्र भेटीदरम्यान प्रश्नावलीच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करून अहवाल तयार केला. तो ऑगस्ट २०१८ मध्ये शासनास सादर करण्यात आला. शासनातर्फे तो स्वीकारण्यात आला असून त्यावर समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

जलयुक्त शिवार पुस्तिका

जलयुक्त शिवार या योजनेसंदर्भात महाराष्ट्र शासनाने केलेल्या विविध उपाययोजनांचा समाज जीवनावर झालेला परिणाम तसेच राज्य शासनाने या संदर्भात राबविलेली पुस्तिका तयार करण्याचे काम रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीकडे सोपविण्यात आले आहे.

सर्व शासकीय विभागांमार्फत या अभियानाशी संबंधित अधिकृत माहिती गोळा करणे, आवश्यक त्या ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करून माहिती संकलित करणे, संबंधित तज्ज्ञ अभ्यासकांना सोबत जोडून तांत्रिक माहिती संकलित करून शब्दबद्ध करणे इत्यादी महत्त्वाची कामे या प्रकल्पामध्ये समाविष्ट होती.

०५ डिसेंबर २०१८ ला या कामाची सुरुवात झाली असून हे काम आता अंतिम टप्प्यात आहे. पुस्तिकेचा प्रारूप अहवाल तपासणीकरीता तयार झाला आहे. संबंधित विभागाची स्वीकृती आल्यानंतर त्यांचा अंतिम अहवाल पुस्तिका तयार करण्यात येणार आहे.

नागपूर विभाग सिंचन विहीर मूल्यमापन

२०१५ च्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी विदर्भातील ११ जिल्ह्यांच्या विकास कामांचा आढावा घेतला होता. या अनुषंगाने झालेल्या नियोजन व आढावा बैठकीत नागपूर विभागातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, विभागातील पूर्वेच्या पाच जिल्ह्यात भूगर्भात पाण्याची उपलब्धता असून विहिरींची संख्या वाढवून विहीर सिंचन क्षेत्रात वाढ करता येणे शक्य आहे.

त्यानुसार सिंचन विहिरींच्या प्रस्तावास नियोजन विभागाने मान्यता देऊन नागपूर विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये ११ हजार सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. सिंचन विहिरींचे त्रयस्थ संस्थेमार्फत भौतिक तपासणी व मूल्यमापन करण्यासाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची निवड करण्यात आली व झालेल्या एकूण विहिरींपैकी २० टक्के विहिरींची तपासणी करण्याचे काम संस्थेला

सोपविण्यात आले.

हे काम २० जानेवारी २०१९ ला सुरू करण्यात आले असून पाच जिल्ह्यातील ५६ तालुक्यांमधील १ हजार ४०१ गावांमध्ये २ हजार २०१९ लाभार्थींना प्रत्यक्ष भेटून माहिती संकलनाचे व विहिरीची भौतिक तपासणी करण्याचे काम संस्थेच्या सर्वेक्षकांनी यशस्वीरित्या पार पाडले.



संपूर्ण विहिरींची तपासणी पूर्ण होऊन संकलित माहितीच्या आधारावर प्रारूप अहवाल लिहिण्याचे काम पूर्ण झाले असून संबंधित विभागामार्फत स्वीकृती आल्यावर अंतिम अहवाल लिहून सादर केला जाणार आहे.


या सर्व प्रकल्पांकरिता मुख्य प्रकल्प समन्वयक म्हणून रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने पंकज गौतम यांनी जबाबदारी पार पाडली. तज्ज्ञ अभ्यासक म्हणून प्रमोद सडोलीकर, पुणे तसेच जलयुक्त शिवार पुस्तिका आणि सिंचन विहीर मूल्य मापन प्रकल्पाकरीता तज्ज्ञ अभ्यासक व सल्लागार म्हणून जयंत पाटील, पुणे यांचे सहकार्य लाभले.

मराठा आरक्षण विषयक सर्वेक्षण

राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न तीव्र बनल्यावर राज्य शासनाने या समाजाला आरक्षण देण्यासाठी अनुकूल स्थिती आहे का, याबाबत सर्वेक्षण केले. हे सर्वेक्षण महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगासाठी करण्यात आले. यामधील कोकण क्षेत्रातील मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाचे आकलन करून घेण्यासाठी सर्वेक्षण करण्याचे काम रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीकडे सोपविण्यात आले होते. हे सर्वेक्षणाचे काम प्रबोधिनीने यशस्वीरित्या पूर्ण केले.

कोकण क्षेत्रातील मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाचे आकलन करून घेण्यासाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व ठाणे या चार जिल्ह्यात सर्वेक्षण केले. प्रत्येक जिल्ह्यातील पाच तालुके निवडले गेले व प्रत्येक तालुक्यातील दोन गावे, एक नगरपालिका व एक नगरपरिषद यांचाही सर्वेक्षणासाठी उपयोग करण्यात आला. एक गाव निवडण्यासाठी एक हजारच्या आत लोकसंख्या व दुसऱ्यासाठी एक हजार ते तीन हजार असे निकष लावले होते. सर्वेक्षणाची एकूण व्याप्ती कोकण भागातील चाळीस गावे, एक नगरपालिका व एक नगरपरिषद होती.

संपूर्ण सर्वेक्षण घरकुल-केंद्रित होते. प्रबोधिनीच्या गटाने ४० गावातील प्रत्येक मराठा घराला भेट देऊन त्यातल्या लोकांच्या प्रतिक्रिया नोंदवल्या. एकूण सहा हजार १५० नमुने गोळा केले. संपूर्ण सर्वेक्षण एप्रिल ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत करून माहिती व अभिप्राय नोंदविण्यात आले. नंतर त्यांचा अहवाल तयार करून तो आयोगाकडे पाठविण्यात आला.



आमची उपलब्ध प्रकाशने

प्रकाशनाचे नाव	लेखक	किंमत रुपये
♦संघटनशास्त्र (पाचवी आवृत्ती)	संपादन- डॉ.विनय सहस्रबुद्धे	१००.००
♦समीक्षा - संचित	लेखक-ज. द. जोगळेकर संपादन-रवींद्र साठे	३००.००
♦डाव्यांची ढोंगबाजी - भ्रष्टाचार, हिंसाचार आणि दंडुकेशाही	माधव भंडारी	७५.००
♦आयसिसचा उद्रेक आणि त्याचे महाराष्ट्रावरील परिणाम	मधुबन पिंगळे	६०.००
♦बाळासाहेब देवरस - कर्तृत्व आणि विचार	भय्याजी जोशी	२५.००
♦भारतीय जनता पार्टी राजकारणात कशासाठी ? (आवृत्ती - मराठी / हिंदी / इंग्रजी)	अमित शाह	२५.००
♦ गोदा परिक्रमेची फलश्रुती - धरणातील पाण्याचे व्यवस्थापन आणि पूरनियंत्रण	संचालित-विलासराव साळुंखे अध्यासन	३०.००
♦ लोकनीतीचे उपासक - लोकनायक जयप्रकाश	मिलिंद बोकील	२०.००
♦छत्तीसगडमधील अंतर्गत सुरक्षितता आणि विकास - नक्षलवादी चळवळीचे परिणाम (अभ्यास अहवाल)	-	२५.००
♦सागरी प्रदूषण - निरीम जलाचा प्रश्न	डॉ. संजय देशमुख, अमोल देशमाने	३०.००
♦राजनीति के उस पार (तृतीय आवृत्ती)	संपादन-सुधीर नांदगांवकर	१५०.००
♦ संगठन कौशल (द्वितीय आवृत्ती)	संपादन-डॉ. विनय सहस्रबुद्धे	१५०.००
♦ Al Qaeda (Global Terror Incorporated)	Sudhakar Raje	५०.००
♦ Left Front Rule in West Bengal : Genesis, Growth and Decay	Dr.Ashok Modak, Atul Bhatkhalkar	४०.००

♦ Development and Internal Security in Chattisgarh : Impact of Naxalite Movement	-	३०.००
♦ Creativity In Cooperation (Four Success Stories)	Niranjan Welankar Ravi Pokharna	४०.००
♦ War On Terrorism (A Compilation of Seminar Papers)	Editor : Ravindra Sathe Milind Arolkar	३०.००
♦ Understanding Human Computer : System and Software Including The excluded	Arvind Bhaskar Rege	१२०.००
♦ (A Study the Impact of Contract Labour Act 1970)	S. M. Dharap	१५०.००
♦ The National Cause : (Selected writings of S. G. Majgaonkar)	Translation : Anand Agashe	२००.००



कर्मचारीवृंद

क्र.	नाव	पद
१.	रवींद्र साठे	महासंचालक
२.	रवी पोखरणा	कार्यकारी प्रमुख – प्रशासन आणि प्रकल्प
३.	उमेश मोरे	मुख्य व्यवस्थापक (देखभाल)
४.	देवेंद्र पै	कार्यकारी प्रमुख–शैक्षणिक कार्यक्रम
५.	आनंद शिधये	प्रशासकीय अधिकारी
६.	सुनील जंगम	कार्यालय अधीक्षक
७.	महेश सावंत	लेखाधिकारी
८.	दिलीप नवेले	ग्रंथपाल
९.	चंद्रकांत जाधव	संकुल सेवा अधिकारी
१४.	दीपक मांगले	देखभाल अधिकारी
१६.	जयवंत शेलार	साहाय्यक अधिकारी – तांत्रिक देखभाल
१७.	मुन्ना मिश्रा	साहाय्यक अधिकारी – निवासी तांत्रिक देखभाल
१८.	जिवबा चव्हाण	साहाय्यक अधिकारी – देखभाल
१९.	गजानन सातुर्डेकर	साहाय्यक अधिकारी (भांडार)
२०.	प्रभाकर नानल	साहाय्यक अधिकारी (आहारसेवा)
२१.	भीमराव पांचाळ	कार्यक्रम समन्वयक
२२.	मुकेश पाटील	कार्यालय समन्वयक
२३.	सागर पाटील	लेखा साहाय्यक
२४.	अजय गोरिवले	अभ्यागत सेवा समन्वयक
२५.	शुभांगी मोरे	दूरध्वनी परिचालिका
२६.	अमर लोहार	निवासी वातानुकूलित यंत्रणा चालक
२७.	मनीष वखारिया	कार्यालय साहाय्यक

२८.	अविनाश डोळस	कार्यालय साहाय्यक
२९.	पुष्पकांत पाटील	कार्यालय साहाय्यक
३०.	आशिष पाटील	कार्यालय साहाय्यक
३१.	रितेश घोगले	कार्यालय साहाय्यक
३२.	दिलीप वळवी	कार्यालय साहाय्यक
३३.	सचिन तायडे	कार्यालय साहाय्यक
३४.	नेहरु वळवी	साहाय्यक तांत्रिक देखभाल
३५.	मानसिंग वेसावे	कार्यालय साहाय्यक
३६.	जालिंदर साबळे	वाहन चालक
३७.	विनोद पाटील	वाहन चालक
३८.	सचिन म्हाबदी	वाहन चालक व विशेष साहाय्यक
३९.	रामदास गावित	वाहन चालक

चंचल कार्यालय	
मिलिंद बेटावदकर	वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी
दीपक ठाकरे	कार्यालय समन्वयक
मारुती वाघमारे	कार्यालय साहाय्यक
पुणे कार्यालय	
स्वाती महाळंक	कार्यकारी प्रमुख–संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे
राहुल टोकेकर	कार्यालय अधीक्षक
मनिषा दायमे	कार्यालय साहाय्यक
दिल्ली कार्यालय	
मुरारी साहू	प्रादेशिक समन्वयक
राजेशकुमार झा	प्रशासन व कार्यक्रम समन्वयक
पंकजसिंह लार्ड	कार्यालय साहाय्यक
अटल प्रतिभा पोषण केंद्र (AIC)	
उदय वान्कावाला	मुख्य कार्यकारी अधिकारी
जितेन अहिरराव	केंद्र व्यवस्थापक
गजानन पाटील	कार्यालय साहाय्यक

व्यवस्थापन समिती (२०१६-१९)



प्रा. अनिरुद्ध देशपांडे
अध्यक्ष



डॉ. विनय सहस्रबुद्धे
उपाध्यक्ष



मंगलप्रभात लोढा
सचिव



अनूप अग्रवाल
सदस्य



प्रताप (भाई) आशर
कोषाध्यक्ष



विजय (भाई) गिरकर
सदस्य



अरविंद रेगे
सदस्य



रेखा महाजन
सदस्य



व्ही. सतीश
सदस्य



रवींद्र साठे
महासंचालक

कार्यकारी समिती

अशोक मुखर्जी	:	भारताचे संयुक्त राष्ट्रातील कायम प्रतिनिधी (निवृत्त)
धनंजय सिंह	:	महासंचालक, एन.एच.आर.डी.एन. – दिल्ली
जय मृग	:	निवडणूक विश्लेषक – मुंबई
जे. एस. माथुर	:	माजी सचिव, पंचायत राज विभाग – भारत सरकार
जॉय बांदेकर	:	कॉर्पोरेट अध्यक्ष – ओला
मंत्री श्रीनिवासन	:	सामाजिक कार्यकर्ते – हैदराबाद
पोपटराव पवार	:	कार्यकारी संचालक – आदर्श ग्राम योजना, महाराष्ट्र राज्य
प्रज्ञेश पोदार	:	तरुण उद्योजक, मुंबई
प्रियांक कानूनगो	:	सदस्या, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग – दिल्ली
डॉ. रामस्वामी बालसुब्रमण्यम्	:	संस्थापक, स्वामी विवेकानंद यूथ मूव्हमेंट – म्हैसूर
सय्यद जाफर इस्लार	:	माजी कार्यकारी संचालक, डॉईश बँक आणि अर्थतज्ज्ञ , दिल्ली
विष्णू मित्तल	:	सामाजिक कार्यकर्ते – दिल्ली

सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमात्र येथे,
सर्वार्थाने रत्नवंत हो क्षेत्र-क्षेत्र येथे,
या भूमीला सृजनांची नभपंखी स्वप्ने द्या,
तुमच्या शुभकर सामर्थ्याची आज प्रचीती द्या...



केशवसृष्टी – ज्ञान नैपुण्य केंद्र, उत्तन, मुंबई.

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
वेबसाईट : www.rmponweb.org

१. मुंबई कार्यालय
१७, चंचल स्मृती, गं. द. आंबेकर मार्ग, श्रीराम इंडस्ट्रीअल इस्टेटसमोर, वडाळा, मुंबई – ४०००३१
दूरध्वनी क्र. +९१ – २२ – २४१३ ६९६६ / २४१८ ५५०२
फॅक्स क्र. +९१ –२२– २४१५६७२५
ई मेल – samparka@rmponweb.org

२. ज्ञान नैपुण्य केंद्र (प्रशिक्षण संकुल)
केशव सृष्टी, उत्तन, एस्सेल वर्ल्ड, भाईंदर (पश्चिम), ठाणे – ४०११०६
दूरध्वनी क्र. +९१ – २२ – २८४५ ०१०१ / २ / ३
फॅक्स क्र. +९१ – २२– २८४५ ०१०६
ई मेल – guestrelations@rmponweb.org

३. पुणे कार्यालय –
संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र
६२६, नारायण पेठ, लोखंडे तालीम शेजारी, पुणे ४११०३०
दूरध्वनी क्र. +९१ – २० – २४४७ ३२७१
फॅक्स क्र. +९१ – २० – २४४६ ५०१२
ई मेल – cibls@rmponweb.org

४. दिल्ली कार्यालय
१३६, नॉर्थ अव्हेन्यू, नवी दिल्ली – ११०००१
दूरध्वनी क्र. +९१ – ११ – २३०९ २०३२
ई मेल – rmpdelhioffice@rmponweb.org



सुशासन संगम राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटक राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह यांना सन्मानित करताना प्रबोधिनीचे उपाध्यक्ष, खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे. यावेळी उपस्थित (डावीकडून) महासंचालक रवींद्र साठे, अध्यक्ष प्रा. अनिरूद्ध देशपांडे आणि व्यवस्थापन समिती सदस्य रेखा महाजन.



आय.आय.डी.एल. तुकडीच्या पदवीप्रदान समारंभात विचार व्यक्त करताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव



'ग्रामीण जीवनात उज्ज्वला योजनेचे योगदान' या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी (डावीकडून) रवींद्र साठे, डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, केंद्रीय पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान, मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर



सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने प्रबोधिनीच्या केशव सृष्टी संकुलात उभारण्यात येणाऱ्या दीनदयाल दर्शन प्रकल्पाचे भूमिपूजन सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते झाले.

मुखपृष्ठ छायाचित्र १ : पुणे येथे आयोजित १२ व्या रामभाऊ म्हाळगी स्मृतिव्याख्यान प्रसंगी दीपप्रज्वलन करताना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, प्रा. अनिरूद्ध देशपांडे आणि इतर.

मुखपृष्ठ छायाचित्र २ : राज्य भाजपच्या वतीने आयोजित प्रदेश माध्यम विभाग कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मलपृष्ठ छायाचित्र १ : शहरी नक्षलवाद या विषयावर उपस्थितांशी संवाद साधताना चित्रपट निर्माता, दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री

मलपृष्ठ छायाचित्र २ : रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या अटल इनक्युबेशन सेंटरचे उद्घाटन करताना नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीवकुमार. सोबत उपस्थित प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे आणि उपाध्यक्ष, खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे